# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०३ प्रस्ताव क्रमांक : १८ दिनांक:- १२/०८/२०२१**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर शहरातील दिपक फोटो स्टुडीओ ते पाठक घरापर्यंत रस्त्यास **"मा.नगरसेवक कै.सतिषशेठ धोकरिया पथ"** असे नामकरण नांव देणे बाबत.
मा.श्रीमती.मंगल सुनील लोखंडे यांची १३/०६/२०१९ रोजीची यादी.

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ :-** मा.नगरसेविका श्रीमती.मंगल सुनील लोखंडे यांची दिनांक १३/०६/२०१९ ची यादी.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट की, अहमदनगर शहरातील दिपक फोटो स्टुडीओ ते पाठक घरापर्यंत रस्त्यास **"मा.नगरसेवक कै.सतिषशेठ धोकरिया पथ"** असे नाव देणे बाबत मा.नगरसेविका श्रीमती.मंगल सुनिल लोखंडे यांची दिनांक १३/०६/२०१९ यदी देवून सुचविले आहे.

कै.सतिष धोकरिया हे तत्कालीन नगरपरिषदेचे नगरसेवक होते त्यांनी याच काळात विविध समित्याचे अध्यक्ष पदही भुषविले असुन त्यांनी शहरातील नागरिकांची सामाजिक बांधिलकीतुन सेवा केलेली असुन त्यांच्या कार्याचा गौरव होण्यासाठी या रस्त्यास त्यांचे नाव द्यावे असे मा.नगरसेविका श्रीमती मंगल सुनील लोखंडे यांनी कळविले आहे.

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही सार्वजनिक रस्त्यास, चौकास, इमारतीस, भुखंडास अथवा सभागृहास नामकरण देण्याचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये मा.महासभेस असल्याने अहमदनगर शहरातील दिपक फोटो स्टुडीआ ते पाठक घरापर्यंत रस्त्यास **"मा.नगरसेवक कै.सतिषशेठ धोकरिया पथ"** असे नामकरण नांव देणे बाबत मा.नगररचनाकार यांचा अभिप्राय घेवुन प्रस्ताव मा.महासभेकडे निर्णयास्तव पाठविणेस मंजुरी मिळणेस्तव रिपोर्ट सविनय सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मा.सहाय्यक संचालक, नगररचना विभाग, विषयांकित चौकास नांव देणे बाबत आपला अभिप्राय मिळावा.

यावर सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा अभिप्राय की, सदर ठिकाणी नामकरण झाले किंवा नाही याबाबतची खात्री करुन प्रस्तावीत काम करण्यास हरकत नाही. विधीग्राह्य कार्यवाही करणे योग्य होईल.

यावर शाखा अभियंता यांचा अभिप्राय की, मा.सहाय्यक संचालक नगररचनाकार यांचे अहवालामध्ये प्रस्तावित विधीग्राह्य कार्यवाही प्रमाणे मा.महासभेची मान्यतेसाठी सविनय सादर.

यावर शहरअभियंता यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर उपायुक्त यांचा अभिप्राय की, चर्चा करा.

यावर शाखा अभियंता यांचा अभिप्राय की, चर्चा झालेनुसार नाव देणे बाबतचे रजिष्टर तपासले असता उपरोक्त नाव दिलेले नाही. मान्यतेस्तव.

यावर शहरअभियंता यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर उपायुक्त सा यांचा अभिप्राय की, विषय मा.महासभेकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.



यवर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

---*---

**चर्चा :-**

**मा.श्री.गणेश कवडे :-** शहरातील गेल्या १ ते २ महिन्यापासून पाणी पुरवठा विस्कळीत झाला आहे. आपण सर्वांनी वेळोवेळी विळद डॅमला भेटी दिल्या. नगर शहरात पाणी पुरवठा विस्कळीत झालेला आहे. दिवसाआड पाणी देत असलो तरी दररोज का देवू शकत नाही. नागरिकांच्या रोषास सामोरे जावे लागते आपण नेमके काय केले पाहीजे. संबंधित वॉलमन व फिटरला फोन करतो पण पाणी पुरवठा सुरळीत होत नाही. रोटेशन प्रमाणे कधी पाणी पुरवठा होईल.

**मा.श्री.अविनाश घुले :-** मा.महापौर व उपमहापौर यांचा पहिलाच जनरल बोर्ड आहे त्यांचा अभिनंदनाचा ठराव मी मांडतो.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** मा.अविनाश घुले यांनी जो ठराव मांडला त्यास मी अनुमोदन देत आहे.

मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** मागील दीड दोन महिन्यापूर्वी सभा झाली त्यात सारसनगरमध्ये घाण पाण्याच्या प्रश्ना बाबत पत्र दिले. त्यावर आयुक्तांनी शेरा मारला सारसनगर बरोबरच, स्टेशन भाग, टिळकरोड, भोसले आखाडा भाग असेल विभागामार्फत काम चालू आहे. परंतु त्याचा अजुन परिणाम झालेला दिसून येत नाही. घाण पाण्याचा प्रश्न अजुन मिटत नाही ताबडतोब घाण पाण्याचा प्रश्नासाठी जे काही करता येईल ते लवकर करुन प्रश्न मार्गी लावावा.

**मा.श्री.दत्तात्रय कावरे :-** सध्याची पाण्याची परिस्थिती अत्यंत खराब आहे. रोज वॉलमनला फोन करावा लागतो. सर्वांत महत्वाचा प्रश्न घाण पाण्याचा आहे. पाणी पुरवठा विभागाकडे कर्मचारी नाही. त्यांना कर्मचारी उपलब्ध करुन दिले पाहीजेत. ते उपलब्ध होत नाहीत. किती लेव्हल राहीली म्हणजे पाण्याला प्रेशर येईल.

**मा.श्री.गणेश कवडे :-** मी मागच्या पाणी पुरवठा विभागाच्या मिटींगमध्ये सांगीतले आमच्या भागात पाणी येत नाही. कर्मचारी पण नाहीत. २-४ लोकांवर काम चालू आहे. फेज-२ मुळे लाईन लिकेज झाल्या आहेत. पाणी वेळेवर येत नाही. पुर्ण दाबाने पाणी येत नाही. अंतर्गत काही हेवेदावे असतील तर नागरिकांना वेठीस धरु नका गेल्या दोन महिन्यापासुन गंमत पाहतो आहेत. तुम्ही पुर्वी प्रमाणे पाणी द्या कर्मचा-यांची नियुक्ती करा.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** खालच्या चुका जोपर्यंत प्रशासनाला सांगत नाही. तोपर्यंत सुधारणा होणार नाही. माझ्या प्रभागात बिल्डर लोकांनी घर बांधले. मी कर्मचारी यांना फोन केला. वसुलीच्या पावतीसाठी ते आठ दिवस कार्यालयात चकरा मारतात. त्यांच्या मागे लागावे लागते. त्या भागातील जे कर्मचारी आहेत ते कार्यालयात थांबत नाहीत. छळण्याचे कारण काय, उशीर करण्यामागे कारण काय आहे. खालचे कर्मचारी काम करीत नाहीत. काही लोकांकडे १०० भाडेकरी आहेत. त्यांना कमर्शिअल टॅक्स लावायला सांगतो पण ते करत नाहीत. नगरसेवकाचे नाव त्यांना सांगतात. पैसे भरुन कनेक्शन घ्यायला बिल्डर तयार आहेत. पण पैसे भरुन घेतले जात नाहीत. भालेराव नावाचा कर्मचारी आहे. त्याला मी मला प्रभागात नविन रोड करायचा आहे.

कनेक्शन दे म्हणून सांगीतले पण त्याला प्रतिसाद दिला जात नाही. आपल्या लोकांनी पैसे भरुन घेतले नाही. तो माणूस चोर नाही. त्याला चोर करायचे पेन्सीलने दंडाची नोंद करायची व नंतर खोडून टाकायची असे केले



जाते. सामान्य माणूस नोंद करायचा टाळतो कारण कर्मचा-यांची बाबूगिरी संपत नाही. त्रास देवून तो यायचा बंद होतो नंतर त्याला दंड आकारुन पट्टी आकारतो. बांधकाम परवानगी देतांना १५ मीटर रोड सात-बारावर असल्यास प्रत्यक्ष मोजणीमध्ये ७-८ मीटर भरतो. साईटवर काम करायला जातो तेव्हा प्रत्यक्षात तेवढी जमिन सापडत नाही. आम्ही तक्रार केली तर कर्मचारी म्हणतात आमचा तक्रार अर्ज लागेल. आज परवानगी देतांना ६-६, ९-९ मीटर जागेवर रस्ता भरत नाही. ३-४ मीटर रोड भरतो कसे काम करायचे. परवानगी देतांना रस्ता मोजून परवानगी दिली पाहीजे. ते कायमचे बांधकाम आहे. खालुन फाईल रेग्युलर गेली तर असे होणार नाही. नविन उपनगर वस्तीमध्ये वाढ होत आहे त्यांना शिस्त लावली पाहीजे. रस्ते, ड्रेनेज लाईन करायचे त्यावेळी तो माणूस बांधकाम कसा करणार. नगररचना विभागाकडील श्री.व्यापारी लिपीक यांना मी फोन केला त्यांनी मला तुमचे पत्र लागेल असे सांगीतले. कर्मचारी चांगल काम करतो त्यांनाच युनिटमधुन काढुन टाकले जाते. अधिकारी निर्णय घेतात कोणी ठरवले ते काम करतात की नाही. आम्हाला विचारले पाहीजे कोण काम करते कोण नाही. काम न करणारे क्रीयाशील दाखवले जाते. मी प्रत्यक्षात साईटवर असतो या याद्या फायनल का झाल्या. काम करणारामुळे माहिती बाहेर जाईल त्यालाच काढुन टाकले जाते. नागापूर - बोल्हेगांव भागात ज्या परवानग्या दिल्या तेथे रोड मिळत नाही. आमचा अर्ज त्या बिल्डरला दाखवायला लागतो का ? महानगरपालिकेच्या प्रत्येक कारवाईला अर्ज आहे का. चुकीचे असेल तर कारवाई करा रस्ता आधी मोजा मग बांधकामाला परवानगी द्या. बांधकाम चालू असतांना आपल्या कर्मचा-याने मध्ये मध्ये व्हीजीट दिली पाहीजे. कोणत्या बिल्डरला माझा त्रास नाही. आम्ही जर बोललो तर वेगळा अर्थ निघतो.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** आपल्या विभागातर्फे जी परमीशन देताना रस्ता कन्फर्म केला जातो. स्थळ पाहणी केल्यानंतर कमेन्समेंट सर्टिफिकेट दिले जाते. या दोन वर्षात रस्ता मोजला आहे. नविन ले-आउट अंतिम करण्याच्या वेळेस सेंटर मार्कीग करुन पोल फिक्स केले तर वाद होणार नाही. भविष्यात मी काळजी घेईल स्पेशल टीम करुन याची पाहणी केली जाईल. जी परवानगी दिली आहे त्यानुसार बांधकाम झाले आहे की नाही. तपासणी करुन घेईल

**मा.श्री.कुमार वाकळे :-** तुमच्या पर्यंत अर्ज यायला किती वेळ लागतो.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** या संदर्भात मी काळजी घेईल.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** रोडमाप घेतांना त्याठिकाणी काहीतरी ठोकण्यात येईल. स.नं.७३.७४.७५ मध्ये जर पाहीले तर परिस्थिती खराब आहे. त्या लोकांवर कारवाई करा मागे घ्यायला सांगा.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** हा अत्यंत चांगला विषय घेतला रोड छोटे होत चालले आहेत यावर ॲक्शन काहीतरी घ्यावी लागेल. शहर बकाल होईल.

**मा.महापौर साहेब :-** नक्कीच आपण तोडगा काढू.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** आपला रस्ता अगोदर काढायचा मग त्यांना परवानगी द्यायची. नंब-या ठोकला तर संबंधिताच्या लक्षात येईल अगोदर रस्ता मोजुन घ्या. आपली हद्द कायम करा. मग परवानगी द्या बांधलेले पाडण्यात आनंद नाही.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** विभागा मार्फत रोड मार्कीग व अतिक्रमण हा विषय घेतलेला आहे.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** नंबरे ठोका त्याला एक विशीष्ट कलर द्या. ले-आउट अंतिम करतांना नंब-या ठोका.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** सर्व्हे नंबर व ले आउट कर्मचारी मागतात ते कर्मचा-यांना माहिती पाहीजे.



**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** रॅम्प रस्त्यावर काढतात. याबाबत संबंधित मालकांना कडक सूचना दिल्या पाहीजेत. रॅम्प रोडवर आणतात समोरा समोर रॅम्प आले तर महानगरपालिकेस रस्ता करता येत नाही. रोडवर येता कामा नाही. रॅम्प हा कंम्पौंडमध्ये आला पाहीजे. याबाबत धोरण निश्चित करा.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** काही ठिकाणी कंम्पौंडच्या बाहेर झाडे लावतात व त्याच्यापुढे तोडी ठेवतात आपल्या केअर टेकरला उचलायला सांगा.

**मा.श्री.दत्तात्रय कावरे :-** सरोष टाकी भरली नाही तर आम्हाला पाणी कसे येणार. पाणी सुटत नाही. प्रेशर नसतो. ३५-४० लोकांना पाणी मिळत नाही.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :-** शहरात गेल्या १ ते दीड महिन्यापासून पाणी विस्कळीत आहे. उपाय योजना करीत आहोत. शहरात पाणी वसंतटेकडी पाण्याच्या टाकीला पहाटे ४-५ फुट लेव्हल येईल तर शहरात पाणी देवू शकतो.

अमृत पाणी पुरवठा योजने अंतर्गत टाकीचा उपयोग करायचा उंचीचा फायदा घेवून लेव्हल मिळवण्याचा प्रयत्न केला परंतु येणारे पाणी दोन्हीकडे विभागले गेले. हवेचा दाब निर्माण व्हायचा परत सिस्टीम चेंज केली. जुनी टाकी वापरत आहोत. गेल्या उन्हाळयापासुन सातत्याने इलेक्ट्रीक कनेक्शन बंद होते. दोन तीन तासांचा फरक पडतो. टाक्या भरुन घेतांना अडचण आली. एका व्हॉलमनने घोळ घातला. टाक्या भरत नाहीत याचा शोध घेतला. वसंत टेकडी येथील तीन पाईप लाईनचा बॉयलर भरल्याने पाणी पुढे जात नव्हते. त्या साफ केल्या आता पाणीपुरवठा सुरु आहे.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे :-** आमच्या प्रभागातल्या पाण्याचा मोटार वारंवार बंद का करतात.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :-** येणारे पाणी हे एवढेच वापरु शकतो. त्यात वाढ होत नाही. वसंतटेकडी येथे मोटार चालू आहे.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे :-** आम्ही सारखा याचा पाठपुरावा करतो. मोटारी तर त्याच आहेत. अगोदर लेव्हल मिळत होती मग आता का मिळत नाही. तुम्ही सिरीयस घ्या वॉलमनने पाणी सुरु केले का त्याला मोटार बंद करायला सांगीतले जाते. आम्हाला फोन वगैरे करायचे नाही असे सांगीतले जाते. यात जर सुधारणा होत नसेल तर आम्हाला आमच्या पध्दतीने काम करावे लागेल. एक दिड महिन्यापुर्वी व्यवस्थीत पाणी पुरवठा होत होता. आता का होत नाही. कधीही प्रेशर मध्ये पाणी येत नाही. एका मोटारवर अठरा तासाच पाणी आहे.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :-** आपण कधीही चेक करु शकता. तुमच्या कडच्या मोटार काढुन टाकणार आहोत. नागरिकांना कनेक्शन घ्यायला आवाहन करु. नागरिकांनी कनेक्शन घेतल्यास टाकी चालू करता येईल. एकेक लाईन चालू करु.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे :-** महापौर, उपमहापौर यांनी याबाबत ठोस आदेश द्यावेत. पाणीपुरवठा जाणुनबुजून विस्कळीत झाला आहे. असा आमचा आरोप आहे.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** आमचा कल्याण रोडवर पाणीपुरवठा १५ दिवसावर गेला आहे. परत १४-१५ दिवसावर कल्याण रोडचा पाणीपुरवठा गेला आहे. कल्याण रोडवर अन्याय का यापुर्वी आठ दिवसावर

पाणी पुरवठा आणला होता. मग आता परत बदल झाला. कल्याण रोड पाण्याचे टाकीचे १५ ऑगष्टला उद्घाटन करणार असे मिटींगमध्ये जाहीर केले. पण अजुन काही झाले नाही.

**मा.श्री.गणेश कवडे :-** वरील सर्वांना बिस्लरी व आम्हाला ग्लासामध्ये पाणी हे कसेकाय.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** ३५ टक्के पाणी कुठे जाते.



**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :-** नागापूर-बोल्हेगांवला पाणी पुरवठा होतो. नविन लाईनचे सावेडी गावठाणसाठी पाणी घेतले जाते. लपवा लपवीचे काहीच कारण नाही. सर्व गोष्टी ओपन आहे. खाली जी सिस्टीम लागते ती आपल्याकडे नाही. आपल्याकडे पाईपलाईन टाकल्या हायड्रोक्लोरीक टेस्टींग न घेता टाकल्या.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** पाईपलाईन रोडवर अनधिकृत टॅप दिले आम्ही सांगीतले तुम्ही काय केले. आपण आमदारांसोबत मिटींग घेतली आहे. त्यावेळी मेनलाईन वरील टॅप काढायचे असे ठरले होते. मग काय केले. मी प्रत्येक मिटींगमध्ये सांगीतले ३ वर्ष झाले. औरंगाबाद रोडवरच्या मेन लाईनवरील टॅप काढा पण अजुन काढले नाही. या सगळया गोष्टीला जबाबदार कोण आम्ही दाखवले. पुढे कधीच होत नाही.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :-** औरंगाबाद हायवेवर काही कनेक्शन आहेत. झोन ऑफीसर व सातपुते इंजिनियर यांना सूचना दिलेल्या आहेत. पोलीस बंदोबस्त घेवून कारवाई होईल.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** मिटींग होवून दीड महिना झाला. मग कारवाई का केली नाही. महापौर उपमहापौर यांनी याची गंभीर नोंद घ्या. या लोकांनी व त्यांच्या व त्यांच्या खालच्या लोकांनी त्यांच्या पदावर राहायचे की नाही हे ठरवा. आमदार साहेबांचा अवमान झालेला आहे.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** बेकायदेशीर कनेक्शन काढण्याचे त्वरीत आदेश निकम यांनी द्यावेत.

**मा.श्री.अविनाश घुले :-** उड्डाणपुलावरील रस्त्यावर १०० ते १५० कनेक्शन मेन लाईनवर आढळले. त्या लाईनवर परत कनेक्शन होवू देवू नका.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :-** खाजगी यंत्रणा आलेली आहे. प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविला आहे. बिगारी, वॉचमन, टेक्नो फिटर कर्मचारी उपलब्ध होतील.

**मा.श्री.दत्तात्रय कावरे :-** आम्ही कोणास पाणी देण्याच्या विरोधात नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** ले-आउट संदर्भात वाकळेंनी जी तक्रार केली त्या संदर्भात बोलतो एक माहिती ०८/०५/२०२१ ला मी माहिति अधिकारात पत्र दिल पण अद्याप मला उत्तर दिले नाही. मला अपीलात जायची वेळ आली. बांधकाम विभागाने उत्तर दिले त्यानंतर नगररचना विभागाला दि.०८/०५/२०२१ ला पत्र दिले. बिल्डर लोकांची मनमानी आहे. खोकर नाल्यावर पुल बांधला. ना नगररचना विभागाची परवानगी नाही. त्यावर ले-आउट तुम्ही मंजूर करता मला याचे उत्तर द्या.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** एक ले-आउट मिळत नव्हता जुना आहे. माहिती मिळून जाईल.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** मला अपिलात जायची वेळ आली. तो पुल बांधला कसा.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** पुलाच्या मंजूरीसाठी मुंबईला जावे लागते.

**इंजिनियर श्री.बल्लाळ :-** यादी आहे. त्यांचे उत्तर तयार केले. माहिती अधिकारात अर्ज नाही. मोरचूद नगर सर्व्हे ६ ची मागणी आहे. एक ले-आउट सापडत नव्हता चूकीची माहिती जावू नये म्हणुन थांबलो. दोन दिवसात माहिती देतो. नाल्याच्या पुलाला परवानगी दिली नाही. तात्पुरत्या मंजूरीत परवानगी देता येईल. त्या रस्त्यावरुन अॅक्सेस देता येईल. मंजूरीतच कंडीशन टाकली आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** पुलाला बांधकाम परवानगी घ्यायला पाहीजे होती. एस्टीमेट व्हायला पाहीजे होते पण तसे झाले नाही. आम्ही तुम्हाला सर्व नगरसेवक मिळून प्रस्ताव देणार आहे. बिल्डर जो विकास करतो तो आपल्याकडे घ्या. आपला अधिकार आहे. चांगल्या दर्जाचे काम होईल. थातुर मातुर काम करतो. मी एक पत्र देतो सर्व नगरसेवकांची त्यावर सही करुन घ्या. चांगल्या दर्जाचे कामे होतील.



**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** काही ठिकाणी बिल्डरने चेंबर बांधले अशा ठिकाणी पाईपच नाहीत, अशी वस्तुस्थिती आहे. यावर १०० टक्के निर्णय घ्यावा लागेल.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** तो जो पुल बांधला तो पुरनियंत्रण रेषेवर बांधला.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** पुलाचे बांधकामासाठी परवानगी झाली. मुंबईला एक संस्था आहे. त्यांची परवानगी लागते.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** ठिकठिकाणी चेंबर करता जोडत नाही. आयुक्तांना मी पत्र दिले होते. त्या नगरसेवकांच्या पत्रांना उत्तरे दिली जात नाहीत. कधीही उत्तर येत नाही. शिंदे साहेबांनी माहिती अधिकारात माहिती मागवावी लागली. आयुक्त साहेबांना पत्राला उत्तर देणेबाबत विनंती केली बिल्डरांनी बेसीक सुविधा देणे आवश्यक आहे. बिल्डींग परवानगी कंम्पीशन देण्या अगोदर एक रोड कंम्पलसरी करावा. नगरसेवकांना नागरिक परेशान करतात. नियमावली क डक करावी. परमिशन देण्याअगोदर काही ठिकाणी कमी रोड भरतात. नगररचना विभागाला विचारले तर रिव्हाईज ले आउट आहे अशी वेगळी उत्तरे देतात. नगरसेवकांना काम करतांना अवघड होईल. पाण्याच्या लाईन आम्ही बुजून द्यायच्या. स्थानिक नगरसेवकांची सही घेतली तर हे प्रश्न भेडसावणार नाही. बाकीच्या नगरसेवकांच्या पत्रांना उत्तरे देण्यांत यावी.

**मा.आयुक्त साहेब :-** ८ दिवसात सदस्यांना उत्तरे द्या १ महिन्यातच उत्तरे देण्यांत यावी. काही रस्त्यांची तपासणी करु चुकीचे असेल तर कारवाई करु जॉईंटली व्हीजीट करायला हरकत नाही मी नगररचनाकार यांना सांगतो.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** २ नंबरच्या विषयावर मला बोलायचे आहे. त्यांचे अहमदनगर शहरावर खूप प्रेम होते. त्यांचे मोलाचे सहकार्य अहमदनगर शहरास होते २ रा हा विषय नामकरण करण्यांत यावे दोन्ही विषय मंजूर करावेत.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** अजेंडयावरील विषय घ्या.

**मा.महापौर साहेब :-** ऑफिस रिपोर्ट मंजूर. खर्च मंजूर.

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर शहरातील दिपक फोटो स्टुडीओ ते पाठक घरापर्यंत रस्त्यास **"मा.नगरसेवक कै.सतिषशेठ धोकरिया पथ"** असे नामकरण, नांव देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.मंगल सुनील लोखंडे

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब मारुती बोराटे

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०३ प्रस्ताव क्रमांक : १९ दिनांक:- १२/०८/२०२१**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर शहरातील कापड बाजार येथील कोहीनूर क्लॉथ स्टोअर ते इमारत कंपनी या रस्त्यास **"कै.प्रदीपशेठ गांधी पथ"** असे नामकरण नांव देणे बाबत..

संदर्भ :- १) मा.नगरसेविका सौ.चोपडा मिना संजय यांची दि.१६/६/२०२१ ची यादी,
२) मा.नगरसेविका सौ.सुरेखा संभाजी कदम यांची दि.२८/०६/२०२१ ची यादी.
३) रसिक ग्रुप, अहमदनगर यांचे दि.१७ जुन २०२१ चे पत्र.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १) मा.नगरसेविका सौ.चोपडा मिना संजय यांची दि.१६/६/२०२१ ची यादी,
२) मा.नगरसेविका सौ.सुरेखा संभाजी कदम यांची दि.२८/०६/२०२१ ची यादी.
३) रसिक ग्रुप, अहमदनगर यांचे दि.१७ जुन २०२१ चे पत्र.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट की, अहमदनगर शहरातील कोहिनूर क्लॉथ स्टोअर ते इमारत कंपनी रस्त्यास **"कै.प्रदीपशेठ गांधी पथ "** असे नाव देणे बाबत मा.नगरसेविका सौ.चोपडा मिना संजय, मा.नगरसेविका सौ.सुरेखा संभाजी कदम व रसिक ग्रुप अहमदनगर यांचे दिनांक १७ जुन २०२१ पत्र यादी देवुन सुचविले आहे.

नगर शहरावर निस्सीम प्रेम करणा-या व नगर शहराचा सामाजिक, आर्थिक योगदान व सांस्कृतिक व क्रीडा यामध्ये अमुल्य योगदान देणारे ज्यांना नगर शहर आजही आठवण करतात असे आपल्या ऐतिहासिक नगर शहरामध्ये भारतातील प्रसिध्द असे महात्मा गांधी रोड व कोहीनूर क्लॉथ स्टोअर्स या दुकानाचे स्व.प्रदीपशेठ गांधी यांचे नुकतेच निधन झाले आहे. नगर शहराच्या विकासासाठी सदैव तत्पर असणा-या नगर शहराचे भुषण यांच्या स्मृती आपल्या नगरकरांना कायम आठवणीत राहाव्या म्हणुन कोहीनुर ते इमारत कंपनी या रस्त्यास **"कै.प्रदीपशेठ गांधी पथ "** असे नाव द्यावे असे मा.नगरसेविका सौ.चोपडा मिना संजय, मा.नगरसेविका सौ.सुरेखा संभाजी कदम व रसिक ग्रुप, अहमदनगर यांनी पत्र देवुन कळविले आहे.

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही सार्वजनिक रस्त्यास, चौकास, इमारतीस, भुखंडास अथवा सभागृहास नामकरण देण्याचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये मा.महासभेस आहे. सदर रस्त्यास यापुर्वी कोणतेही नाव देण्यात आलेले नाही. त्यामुळे अहमदनगर शहरातील कापड बाजार येथील कोहिनूर क्लॉथ स्टोअर ते इमारत कंपनी या रस्त्यास **"कै.प्रदीपशेठ गांधी पथ "** असे नामकरण नांव देणे बाबतचा प्रस्ताव मा.आयुक्त यांनी दिनांक ०२/०८/२०२१ अन्वये मा.महासभेकडे निर्णयास्तव पाठविणेस मंजुरी दिलेली आहे त्यानुसार सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे निर्णयास्तव सविनय सादर.

---*---

**चर्चा :-**

**मा.सौ.सुरेखा कदम :-** कोहीनूर क्लॉथ स्टोअरचे गांधी यांचे नगर शहरावर खूप प्रेम होते. कोहीनूरच्या माध्यमातुन नगर शहराचे नाव राज्यात नेले आहे. अशा व्यक्तीचे नाव नगर शहरास देण्यांत यावे.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** प्रदीप गांधी यशस्वी उद्योजक होते त्यांनी नगर शहराचे नावलौकीक राज्यभरात केले. त्यांचेकडे ४०० कर्मचारी काम करतात त्यांना उपजिवीकेचे साधन उपलब्ध करुन दिले. व्यवसाय करत असतांना सामाजिक, सांस्कृतिक योगदान त्यांनी दिले आहे. नगरशहर सुशोभिकरणाच्या कामात योगदान दिले. कोव्हीड काळात बूथ हॉस्पीटलला चांगली मदत केली आहे. रसिक ग्रुपच्या माध्यमातून जो कार्यक्रम होता त्याला मदत दिली जायची सर्व गोष्टीत त्यांनी सहकार्य केले आहे. सन्माननीय प्रदीपशेठ गांधी यांचे नाव देण्याचा सर्व खर्चास मंजूरी द्यावी. नामकरणाचा जो कार्यक्रम होईल त्याचा खर्च महानगरपालिकेने करावा. प्रदीपशेठ गांधी यांचा १८ तारखेला स्मृतीदिन आहे. त्या दिवशी हा कार्यक्रम घ्यावा.

**मा.सौ.मीना चोपडा :-** पुढील पिढीला आठवण व्हावी. पुण्यतिथीच्या दिवशी फलकावर नांव द्यावे.

विषय क्रमांक २२ कोरोनामुळे खूप मोठे नुकसान झालेले आहे. हा बोजा सहन होत नाही. नियम १९४९ कायद्यानुसार कलम १३३ नुसार घरपट्टी पाणीपट्टी माफ करावी.

**मा.महापौर साहेब :-** विषय क्रमांक १८ व १९ चे ऑफिस रिपोर्ट मंजूर. पुढचा विषय घ्यावा.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** आपल्या सभागृहात चार वर्षापुर्वी छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविणेचा विषय मांडला तो सभागृहाने मंजूर केला त्यावर आत्तापर्यंत काय कार्यवाही झाली. वेगवेगळया संघटना आता मागणी करायला लागल्या आहेत.

संभाजी महाराजांचा पुतळा मोबाईल टॉवरच्या हेडमधुन उभा करायचा आहे.

**अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :-** महानगरपालिका आवारात शिवाजी महाराज पुतळा उभारणेस महासभेने ठराव केला. मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. त्यानुसार पोलीस विभागाकडे दीड वर्षापुर्वी प्रस्ताव सादर केला पण मा.जिल्हाधिकारी यांचेकडून येवू द्या असे सांगीतले. मा.जिल्हाधिकारी महोदयांनी १३ प्रपत्रानुसार सादर करण्यांस सांगीतले आहे. क्ले मॉडेल, चीफ आर्टिकल, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाची संमती पाहिजे ती शासनाकडे पाठवत आहोत.

छत्रपती संभाजी महाराज पुतळयास सभेने मंजूरी दिली. पुतळयाचे ८० टक्के पेमेंट अदा केले. पोलीस विभागाने सहमती दिली नव्हती. गंगा उद्यान येथे बसवणे योग्य होईल असे सांगीतले. प्रोफेसर कॉलनी शॉपिंग सेंटरच्या जागेत पुतळा बसवण्यास परवानगी मागीतली कोव्हीडमुळे उशीर झालेला आहे. शासनाकडे एनओसी बाबत आठ दिवसात प्रस्ताव जाईल जिल्हाधिकारी साहेब व एस.पी.साहेबांकडे पाठपुरावा करु लवकरात लवकर करु.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** असे रुलिंग द्यावे. पुतळयाचे एक तैलचित्र फिक्स करुन पुतळा बनविण्याचे ऑर्डर देवून टाका शासनाकडून परवानगी घेत राहू.

**मा.आयुक्त साहेब :-** पुतळयाच्या बाबतीत शासनाने २०१७ ला निर्णय घेतला जिल्हा स्तरावर समिती स्थापन केली. चार पुतळे उभारणे प्रश्न प्रलंबीत आहे. यामध्ये २०१७ जी.आर.मध्ये १२-१३ गोष्टी सांगीतल्या आहेत. पुतळा कसा पाहीजे. अगोदर क्ले मॉडेल बनवावे लागते. ते झाल्यानंतर महानगरपालिकेने मॉडेल ॲप्रुव्ह केले नंतर पुढच्या गोष्टी आपल्यास करायच्या आहेत. यासाठी मी कालच २ टक्के शहर अभियंता, उपायुक्त डांगे यांचेशी याविषयावर चर्चा केली आहे. तीन महिन्यामध्ये एक ॲक्शन प्लॅन करु. क्ले मॉडेल बनवून आपल्या लेव्हलला समिती करुन मॉडेल बनवावे लागेल ते फायनल झाल्यानंतर

कलासंचालनालयची  मंजूरी घ्यावी लागेल. चार ते सहा महिन्यात पूर्ण होईल. डांगेसाहेबांकडे हे काम पूर्ण दिले आहे.  डिसेंबर पुर्वी दोन पुतळयाला अडचण येणार नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले पुर्णाकृती पुतळे संदर्भात महात्मा फुले पुतळयाची जागा निश्‍चित करतांना हाईट परवानगी देतांना मुळ व्यक्तीमत्वात बदल करता येत नाही. ते पाहता उंचीची जागा उपलब्ध होईल की नाही ते पहावे लागेल. पुतळा कसा पाहिजे हे अगोदर ठरवावे लागेल.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे :-** खुर्चीवर बसलेले महात्माफुले ही पुतळे आहेत.

**मा.आयुक्त साहेब :-** महासभेने चार-पाच सदस्यांची समिती ठरवा. डिसेंबरच्या आत पुतळे बसतील.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** प्रत्येक सभागृह नेत्यांकडून नाव सूचवावे. राष्ट्रवादीचे श्री.कुमार वाकळे, शिवसेनेतील श्री.अनिल शिंदे, भारतीय जनता पार्टीकडून श्री.रविंद्र बारस्कर, कॉग्रेस श्रीमती.रुपालीताई वारे, श्री.आसीफ सुलतान.

**उपमहापौर मा.श्री.गणेश भोसले :-** श्रीमती.अश्विनी सचिन जाधव यांना घेण्यांत यावे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** कारागीर नगर शहरात आहेत. नॅशनल ॲवार्ड मिळालेले आहेत. आपल्याला कायम मार्गदर्शन होईल. कांबळे इंटरनॅशनल कारागीर आहेत.

**मा.आयुक्त साहेब :-** उद्या आदेश काढतो. समितीला पहिल्यांदा तिथे जावे लागेल. चारही पुतळयाच्या ठिकाणी जागा फायनल करतो.   क्ले मॉडेल करावे यासाठी तुमची मिटींग लावून घ्या.

**मा.महापौर साहेब :-** महापौर आणि उपमहापौर, श्री.कुमार वाकळे, श्री.रविंद्र बारस्कर, श्रीमती.रुपालीताई वारे, श्रीमती. अश्विनी सचिन जाधव, श्री.आसीफ सुलतान महानगरपालिकेच्या वतीने पुतळे बसविणेकामी समिती गठीत करण्यांत येत आहे. विषय क्रमांक १९ चा ऑफिस रिपोर्ट मंजूर. खर्च मंजूर.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर शहरातील कापड बाजार येथील कोहीनूर क्लॉथ स्टोअर ते इमारत कंपनी या रस्त्यास **"कै.प्रदीपशेठ गांधी पथ"** असे नामकरण नांव देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्‍चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.मीना संजय चोपडा,

अनुमोदक :- मा.सौ.सुरेखा संभाजी कदम,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
# नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०३ प्रस्ताव क्रमांक : २० दिनांक:- १२/०८/२०२१**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रधानमंत्री आवास योजना AHP घटकातील प्रकल्पाकरीता Sole Selling and Marketing Assistance करीता खाजगी एजन्सीची नियुक्ती करणे बाबत...

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ :-** दिनांक १२/०३/२०२१ रोजी झुम ॲप व्दारे झालेली बैठक.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेमार्फत प्रधान मंत्री आवास योजना AHP घटका अंतर्गत खालील प्रमाणे प्रकल्प मंजुर आहेत.

| अ.क्र. | घटकाचा तपशिल | मंजुर सदनिका | लाभार्थी हिस्सा (प्रति लाभार्थी) |
|---|---|---|---|
| १ | मोरचुनगर (संजयनगर ) सं नं. -५ | २९८ | रु. १,००,०००/- |
| २ | केडगांव स. नं. २०६/१ अ | ६२४ | रु. ६,४४,०००/- |
| ३ | नालेगांव स. नं. ४१/१, ४३/३ | २१६ | रु. ७,४०,०००/- |
| ४ | नालेगांव स. नं. ४४ (आगरकरमळा) | ५९४ | रु. ७,५८,०००/ |

वरील चार प्रकल्पांपैकी संजयनगर येथील प्रकल्पांकरिता लाभार्थी हिस्सा अत्यंत कमी आहे. व सदर प्रकल्पास करी स्टोन फाऊंडेशन या संस्थेचे देखील अनुदान प्राप्त होणार आहे. उर्वरित ३ प्रकल्पांकरिता लाभार्थी हिस्सा रक्कम मोठी आहे. व शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान केवळ रक्कम रु. २.५० लक्ष हे निश्चित आहे.

प्रधानमंत्री आवास योजना (AHP) लाभार्थी हिस्सा जास्त असल्यामुळे सदर योजनेस अल्प प्रतिसाद मिळत आहे. व काही लाभार्थी यांनी लाभार्थी हिश्श्या पैकी भरलेली रक्कम परतावा बाबत मागणी केलेली आहे. सदर योजने अंतर्गत लाभार्थी प्राप्त होणे करीता खालील प्रमाणे अडचणी येत आहेत.

१) सदर योजने करीता लाभार्थी आर्थिक दुर्बल घटकातील अल्यामुळे व लाभार्थी हिस्सा किमान ६.४४ लक्ष ते कमाल ७.५८ लक्ष असल्याने लाभार्थीस आर्थिक अडचणी येत आहेत.

२) सदर योजने अंतर्गत बहुतांश लाभार्थ्यांचे उत्पन्नाचे स्त्रोत शासवत नसल्याने लाभार्थीस बॅकेकडून कर्ज मंजुरीस अडचणी निर्माण होत आहेत.

३) बहुतांश लाभार्थीस कर्ज प्रकरण विषयी आवश्यक त्या कागदपत्रांची माहिती नसल्यामुळे त्यांना मार्गदर्शनाची आवश्यकता आहे.

४) अहमदनगर महानगरपालिकेमध्ये प्रधानमंत्री आवास योजनाचे प्रकल्प मंजुर आहे अथवा स्दर योजनेचे काम सुरु झाले आहे याबाबत पुरेशा प्रमाणात जाहीरात झाली नसल्याने योजनेस पुरेशा प्रमाणात प्रतिसाद मिळत नाही.

५) सदर योजनेस अद्यापपर्यंत शासनाकडुन अनुदान प्राप्त न झाल्यामुळे काम अत्यंत संथ गतीने चालु आहे याचा देखील परीणाम लाभार्थीच्या मिळणा-या प्रतिसादावर होत आहे.

त्यानुसार वरील प्रमाणे परिस्थिती पहाता प्रधानमंत्री आवास योजना यशस्वीपणे राबविणे करीता Sole Selling and marketing assistance ची नियुक्ती करणे आवश्यक आहे. या करीता खालील प्रमाणे Scope of Services समावेश करणे आवश्यक आहे.

अ) सदनिकेची विक्री करणे, प्रकल्पाची जाहिरात करणे, वरील ३ प्रकल्पाचे Coustomer Relationship Manegement करणे व अंदाजे १८ महिन्याच्या कालावधीमध्ये लाभार्थ्यांचे १००% बुकींग करुन घेणे.

ब) प्रकल्पाची ऑनलाईन व ऑफलाईन मार्केटींग करणे.

क) लाभार्थीस विविध वित्तीय संस्थेकडुन गृहकर्ज प्राप्त करुन घेणे करीता सहाय करणे व प्रकल्पाकरीता लाभार्थीकडुन कर्ज मंजुरी लाभार्थी हिस्सा प्राप्त करुन घेणे.

ड) लाभार्थीस सदनिका खरेदी केल्यानंतर नोंदणी करीता सहाय्यता करणे.

इ) अहमदनगर मनपास प्रकल्पाच्या प्रगतीनुसार कॅश फ्लो मेनटेन करणे करीता सहाय्यता करणे.

ई) अहमदनगर मनपास वरील ३ प्रकल्पांचे रेरा रजिस्ट्रेशन करणे करीता संपुर्ण सहाय्यता करणे.

प) वरील ३ प्रकल्पांकरीता Sole Selling and Marketing Assistance करीता नेमणुक केलेल्या एजन्सीचे मनपा हद्दीमध्ये लाभार्थ्यांच्या सोयीच्या दृष्टीकोनातुन एक कार्यालय असेल व सदर ठिकाणी कुशल मारकेटींगचे ज्ञान असणारे कर्मचारी नियुक्त करावे लागेल.

फ) सदर एजन्सीस मार्केटींग करीता आवश्यक ते Hoarding,Brochure,Webpage चा खर्च स्वत: करावा लागेल.

सदर कामी एकुण सदनिका रक्कमेच्या १% रक्कम मनपा मार्फत व १% रक्कम लाभार्थी मार्फत सदर एजन्सीस अदा करणे उचित वाटते. वरील ३ प्रकल्पांची लाभार्थी संख्या एकुण १४३४ इतकी आहे व प्रकल्प निहाय प्रति सदनिका रक्कम खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रकल्पाची प्रति सदनिका रक्कम | मनपा हिस्सा १% नुसार खाजगी एजन्सीस देय असलेली अंदाजे रक्कम. | प्रति सदनिका रककमेच्या १% येणारी रक्कम |
|---|---|---|---|
| १ | केडगांव स. नं. २०६/१ अ येथील सदनिका रक्कम रु. ८,९४,००० x ६२४ सदनिका = ५५,७८,५६०००/- | रु. ५५,७८,५६०/- | ८,९४०/- |
| २ | नालेगांव स. नं. ४१/२,४३/३ येथील सदनिका रक्कम रु. ९,९०,००० x २१६ सदनिका = २१,३८,४०,०००/- | रु.२१,३८,४००/- | ९,९००/- |
| ३ | नालेगांव स. नं. ४४ येथील सदनिका रक्कम रु. १०,०८०००/- x ५९४ सदनिका = ५९,८७,५२,०००/- | रु.५९,८७,५२०/- | १०,०८०/- |

त्यानुसार वरील ३ प्रकल्पाकरीता Sole Selling and Marketing Assistance करीता खाजगी एजन्सीची नियुक्ती करावयाची झाल्यास सदर एजन्सीस मनपा हिश्शामधुन १% रक्कम (१००% लाभार्थ्यांनी

वरील प्रमाणे प्रस्तावानुसार कर्ज मंजुरीसाठी सहाय्यता घेतल्यास) अंदाजे एकुण रक्कम रु.१,३७,०४,४८०/- इतका खर्च अपेक्षित आहे परंतु प्रत्यक्षात सर्व लाभार्थी वरील प्रमाणं प्रस्तावानुसार कर्ज मंजुरीसाठी सदर एजन्सी मार्फत अर्थ सहाय्य घेतील असे बंधनकारक नाही व लाभार्थीस कर्ज प्रकरण करुन घेणे अथवा नाही याबाबत सर्व निर्णय स्वतः लाभार्थी घेईल. तसेच वरील प्रस्तावानुसार लाभार्थीस कर्ज मंजुरीची आवश्यकता असल्यास मनपा मार्फत नियुक्त केलेल्या एजन्सीच्या सहाय्यची गरज भासल्यास लाभार्थ्यांस मनपामार्फत प्रति लाभार्थी प्रति सदनिका रक्कमेच्या १% खर्चा व्यतीरीक्त अतिरिक्त १% रक्कम स्वखर्चाने द्यावी लागणार आहे.

सदरची योजना पुर्ण होणेस किमान २ वर्ष कालावधी लागण्याची शक्यता असल्याने सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये अंदाजे ७०० लाभार्थी ग्रहीत धरल्यास रक्कम रु. ६६.५० लक्ष इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

तरी अहमदनगर मनपा प्रकल्पा करीता योजनांची प्रभावीपणे राबविणे करीता व लाभार्थ्यांना कर्ज स्वरुपात अर्थ सहाय्य प्राप्त करुन देणे व वरील ३ योजनेची जाहित करणे करीता Sole Selling and Marketing Assistance करीता खाजगी एजन्सीची नियुक्ती करणे बाबत ई-निविदा मागविणे बाबत व एकुण खर्च अंदाजे रक्कम रु १,३७,०४,४८०/- प्रशाकीय मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव मा. महासभेसकडेस सविनय सादर.

---*---

**चर्चा :-**

**मा.सौ,शीला चव्हाण :-** सिध्दार्थनगर भागाचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. मध्यंतरी ५ ते ५.३० वाजता सोडायचे आता ८.०० किंवा ८.३० वाजता पाणी येते. कामावर केंव्हा जायचे.पहिले २.०० ते २.३० वाजता पाणी यायचे तेंव्हा तक्रार नव्हती आता मी या लोकांना काय उत्तर देवू. २.३० वाजता पाणी सोडण्यांत यावे. येथे बहुतांश सफाई कामगार राहतात त्यांना सकाळी कामावर जावे लागते. उशीरा पाणी सोडल्याने त्यांना पाणी भरता येत नाही.

**इंजिनियर श्री.सातपुते :-** पाणी पुरवठा सुरळीत झाला की, वेळेचे पुर्वीसारखे नियोजन करीत आहोत. आयुक्त साहेबांशी कालच चर्चा झाली आहे. १५-२० दिवसांपासुन एमएसईबी मुळे पाणी पुरवठा विस्कळीत झालेला आहे. १५-२० दिवसानंतर सुरळीत झाले की निर्णय घेवू.

**उपमहापौर मा.श्री.गणेश भोसले :-** पाणी चहा देतांना खाली व स्टेजवर एकच प्रकारचे कप द्यावे.

**मा.श्री.रामदास आंधळे :-** नवलेनगर मध्ये रस्त्यावर खड्डे पडले आहेत. कुणीतरी नळ कनेक्शन घेतात. नवलेनगर, आनंदनगर मध्ये घंटा गाडी येत नाही. तात्पुरता मुरम टाका. पावसाळयानंतर व्यवस्थीत करा.

**शहर अभियंता श्री.इथापे :-** पाउस चालू असल्यामुळे डांबरीकरणाचे पॅचींग करता येत नसल्याने शहरात ब-याच ठिकाणी खड्डे आहेत. डब्ल्यु.बी.एम.पॅचींग केले, प्रभाग क्रमांक १ व ३ साठी टेंडर मागविले. पुढील आठवडयात पाउस आला नाहीतर पॅचींग करणार आहोत. प्रामुख्याने शहरातील मोठे रस्ते डी.पी.रोड त्यानंतर सेकंड फेजमध्ये इतर रस्ते घेणार आहोत.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** तपोवन रोडला जी आग लागली त्या गाळेधारकांना शासनाकडून काहीतरी मदत करण्यासाठी काही करता आले तर मदत करावी. त्यावर निर्णय घ्या. सर्वजण पाहणीला गेले होते.

**मा.आयुक्त साहेब :-** महसुल विभागाचे तलाठी यांनी पंचनामा केला आहे. आगीचे कारण वगैरे पाहून ते निर्णय घेतील. महानगरपालिकेकडे अशी तरतुद नाही. प्रस्ताव शासनाकडे पाठवू शकतो. शासनाकडे मागणी करु.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** बांधकाम परवानगी देतांना त्यानंतर त्या त्या भागात आपला एक टेक्नीशीयन माणूस पाहणीसाठी असतो त्यास जर अतिरिक्त काम दिले कंम्पौंडच्या बाहेर नागरिक झाडे दोन्ही बाजुने लावतात. एक सर्व्हे त्यांनी करावा ते काढुन घ्यावे अशी सूचना करावी.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** परवानगी देतांना कमीत कमी पाच झाडे लावणे बंधनकारक केले आहे. रेनवॉटर हार्व्हेस्टींग बंधनकारक केले आहे. रोडची मार्कींग करायची मंजूरी दिली आहे. त्यानुसार जबाबदारी नागरिकांची आहे. प्रशासनाने आदेश दिले त्यानुसार पाहणी केली जाईल.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** चव्हाण यांची १० वर्षाची मुलगी डेंग्युने वारली. मी वारंवार संपर्क केला आरोग्यअधिकारी या सभेत हजर पाहीजे. या मुलीचे रेकॉर्ड आपल्याकडे आले ती धर्मा हॉस्पीटलला वारली.

**आरोग्य अधिकारी डॉ.श्री.राजुरकर :-** माहिती घेवून सांगतो.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** कोरोनाचे बील भरुन नागरिकांचे कंबरडे मोडले आहे. डेंग्युने लोक मरतात.

**आरोग्य अधिकारी डॉ.श्री.राजुरकर :-** ॲन्टीजेन पॉझिटीव्ह संशयीत रुग्ण धरले जातात. रक्ताचे नमुने पॉझिटीव्ह आल्यानंतर सर्व्हेक्षण करुन ॲबेटिंग करुन घेतले आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** माझ्या वॉर्डात सध्या २५ पेशंट आहेत. आपण काही केलेले नाही. याची माहिती घेतली का.

**आरोग्य अधिकारी डॉ.श्री.राजुरकर :-** साथ रोगाची माहिती खाजगी रुग्णालयाकडून माहिती मिळाली की, शासनाकडून माहिती घेवून कारवाई करतो. जलजन्य आजार डासामुळे होतो. आरोग्य केंद्रामार्फत सर्व्हेक्षण करतो. मलेरिया मार्फत स्प्रे करणेचे काम नेहमीसारखे पावसाळयात करतो. तुम्ही ज्या मुलीची माहिती दिली त्यांची माहिती घेतो.

**उपमहापौर मा.श्री.गणेश भोसले :-** फॉगींग फवारणी कुमार भाउंच्या वॉर्डात करा. तुम्ही समक्ष जा.

**मा.सौ.रुपाली वारे :-** २१ नंबर विषय आहे. एकुण किती जागा रिक्त आहेत.

**आरोग्य अधिकारी डॉ.श्री.राजुरकर :-** सध्या एनयुएचएम चे ६२ पदे आहेत. ५५ भरले ७ रिक्त आहेत. राष्ट्रीय क्षयरोग १७ पद भरले व एक रिक्त आहे. ८ रिक्त २ डॉक्टर, ४ सिस्टर बाकीचे टेक्नीशियन आहेत. पद भरण्याचा अधिकार डेप्युटी डायरेक्टर यांना आहेत. गेल्या ६ महिन्यापासून रिक्त आहेत. पाठपुरावा केला आहे. आपल्याला अधिकार मिळाल्यास करु. आपल्याला भरतीचे अधिकाराबाबत आता मागच्या महिन्यात कळाले आहे.

**मा.सौ.रुपाली वारे :-** प्रस्ताव आस्थापना विभागाकडून आपण भरती करु शकतो का ?

**आरोग्य अधिकारी डॉ.श्री.राजुरकर :-** पद निर्मितीसाठी प्रस्ताव महासभेसमोर सादर केला आहे. त्यापुढे शासनाची पुढची कार्यवाही आस्थापना विभागामार्फत होणार आहे.

**मा.सौ.रुपाली वारे :-** आपण विषय मंजूर केला तर प्रशासन मंजूरी देईल का.

**आरोग्य अधिकारी डॉ.श्री.राजुरकर :-** प्रस्ताव पदनिर्मितीचा आहे. प्रशासनाने बिंदु नामावली सामाजिक आरक्षण कीती वर्षाच्या व्यक्तीला प्राधान्य द्यायचे याबाबत प्रशासन घेईल. सध्या त्यांना एकत्रित वेतन दिले जाते. शासनाकडून वेतन मिळालेल्या जागांचा भार महानगरपालिकेवर नाही.

**मा.सौ.रुपाली वारे :-** योग्य मोबदला त्यांना मिळालाच पाहीजे. त्यांनी कोरोना बाबत चांगले कार्य केले आहे.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** हायवे लगत दुकानदारांना केडगांवच्या ११७ लोकांना नोटीसा दिल्या. उपायुक्त शहरात कोणतीही परवानगी न घेता टपरी बांधल्या त्यांना कलम ५२-५३ खाली नोटीस दिल्या. २२०० सुनावण्या घेतल्या. ग्रामपंचायत झाल्यापासुन ही दुकाने आहेत. त्यांना नोटीसा गेल्या आहेत. त्यांना सर्वांना न कळवता एक-एक दोन दोन लोक बोलावले गेले. त्या त्या भागातल्या प्रतिनिधींना कळवले का.

**उपायुक्त श्री.डांगे :-** अनधिकृत व अतिक्रमण संदर्भात माहिती देत नाही. अशी आपलीच मागणी असते. याठिकाणी अनधिकृत बांधकाम झाले त्यांचे म्हणणे ऐकुण घेण्यासाठी सुनावणी लावली.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** आम्ही त्यांच्या मध्ये येत नाही. त्या नागरिकांच्या समस्या ऐकुण घेण्यासाठी एक मिटींग घ्या.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे :-** पत्र्याच्या टप-यांना टॅक्स आकारणी करण्यांत आली का.

**इजिनियर श्री.बल्लाळ :-** एमआरपी ॲक्ट खाली कलम ५२-५५ खाली नोटीस दिली. बिल्डींग परवानगी घेतली असेल तर ती दाखल करा. अथवा ३० दिवसात परवानगी घ्या. असेल तर इकडे सादर करा. ३ मुद्यांचे ऑप्शन दिले आहे. प्रत्येकाने उत्तर दिलेले नाही. एकानेही परवानगी आणली नाही. ग्रामपंचायतीची परवानगी असू द्या प्लॉटच्या बाहेर बांधतात. रस्त्याला अडचण आणतात. टॅक्स पावती मध्ये टॅक्स लागला म्हणजे बांधकाम अधिकृत होत नाही.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे :-** अनधिकृत असेल तर कारवाई करावी. पट्टी आकारु नये.

**इंजिनियर श्री.बल्लाळ :-** परवानगी असेल तर द्यावी नक्कीच विचार होईल.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** २०-२० ४०-४० ६०-६० च्या ग्रुपने बोलवा.

**उपमहापौर मा.श्री.गणेश भोसले :-** बोलावुन घ्या. केडगांव ग्रामपंचायत असतांना परवानगी घेतली. ती सापडत नाही. रेकॉर्ड हॅण्ड ओव्हर केले. ५० वर्षाचे रेकॉर्ड कोणाकडे कागद नाही. त्या काळात या गोष्टीना महत्व नव्हते. त्यावेळेचे घर आहेत. दुकाने आहेत गावठाण भागातही हा विषय आहे. तुम्ही रेकॉर्ड सापडा. त्यावेळेला ग्रामपंचायत होती. केडगांवचे रेकॉर्ड शोधा. रेकॉर्ड तुम्ही शोधा.

**इंजिनियर श्री.बल्लाळ :-** समाज अंतरात जे बांधकाम आहे त्यांना नोटीसा काढल्या आहेत.

**उपमहापौर मा.श्री.गणेश भोसले :-** साईड मार्जिन मध्ये जे बांधले ते काढा.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** विषय क्रमांक २० मंजूर करा.

**इंजिनियर श्री.मेहेत्रे :-** अेएचपी अंतर्गत ४ योजना मंजूर असुन कुठलाही निधी आलेला नाही. संजय नगरचे जे बिल्डींगचे काम चालू केले आहे. लाभार्थी यांचे बँक लोन होत नाही. मार्केटींग व्यवस्थीत होत नाही. कर्ज सहाय्यासाठी लाभार्थी १ % देईल. १७३२ घरे आहेत. स्टेटचा संजयनगरला १३ लाखाचा फंड वर्ग करणार आहोत.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** आयुक्त साहेब यांनी निधीसाठी फॉलोअप घ्यावा.

**मा.महापौर साहेब :-** पुढचा विषय २१ चे वाचन करा. १८-१९-२० ऑफिस रिपोर्ट मंजूर केले आहेत.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. खर्च मंजूर. अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रधानमंत्री आवास योजना AHP घटकातील प्रकल्पाकरीता Sole Selling and Marketing Assistance करीता खाजगी एजन्सीची नियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.अनिल माधवराव शिंदे,

अनुमोदक :- मा.सौ.सुरेखा संभाजी कदम,

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०३ प्रस्ताव क्रमांक : २१ दिनांक:- १२/०८/२०२१**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिके अंतर्गत राष्ट्रीय आरोग्य अभियान (एन. यु. एच. एम. / आर.सी.एच.) एन.टी.ई.पी (राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरन कार्यक्रम) मधील कंत्राटी कर्मचा-यांना महानगरपालिकेच्या कायम स्वरुपी सेवेमध्ये सामावुन घेणेकामी कार्यवाही बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ :-** १) मा.महापौर यांचेकडील जा.क्र.२९ दिनांक ०७/०६/२०२१ रोजीची सूचना.
२) मा.महापौर यांचेकडील जा.क्र.३० दिनांक ०७/०६/२०२१ रोजीची सूचना.
३) पिंपरी चिंचवड मनपाचा NUHM व NTEP च्या कर्मचा-यांना मनपा कायम सेवेमध्ये सामावून घेणे बाबतचा ठराव / उपसुचना.

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार रिपोर्ट सादर करण्यांत येतो की, अहमदनगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडे राष्ट्रीय आरोग्य अभियान (एन.यु.एच.एम./आर.सी.एच.), एन.टी.ई.पी.(राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरन कार्यक्रम) उपक्रमांतर्गत मागील साधारण १० ते १२ वर्षापासुन विविध पदावर वैद्यकीय व नीम वैद्यकीय व इतर कर्मचारी एकत्रित मासिक मनधनावर कंत्राटी पध्दतीने (तांत्रिक खंड देवुन ११ महिन्यांच्या नियुक्तीवर) कार्यरत आहेत. सदर कर्मचारी आरोग्य विभागाच्या विविध नागरी आरोग्य केंद्रामध्ये शासनाचे विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम व आरोग्य संबंधी सेवा पुरवित आहे.

वरील योजनेमध्ये कार्यरत कर्मचा-यांनी मा.महापौर यांचेकडे मनपाच्या सेवेमध्ये कायमपदावर सामावुन घेणे बाबत विनंती अर्ज दिलेले आहेत. त्या अनुषंगाने संदर्भ क्रमांक १ व २ नुसार मा.महापौर यांनी (एन.यु.एच.एम./आर.सी.एच.), एन.टी.ई.पी. (राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरन कार्यक्रम) मधील कंत्राटी कर्मचा-यांनी सादर केलेल्या निवेदनावर प्रस्ताव महासभेपुढे ठेवणे बाबत निर्देश दिलेले आहेत.

महानगरपालिकेच्या सेवा प्रवेश नियम व आकृतीबंधा संबंधी नवीन पदे निर्माण करणे, सेवा समायोजन करणे इत्यादी बाबी महाराष्ट्र राज्य शासनाच्या नगरसचिव विभागाच्या मान्यतेने करणे आवश्यक आहे. सध्या आरोग्य विभागामध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियान (एन.यु.एच.एम./आर.सी.एच.), एन.टी.ई.पी. (राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरन कार्यक्रम) सोबतच्या तक्त्यानुसार विविध वैद्यकीय, नीमवैद्यकीय व इतर पदावर कर्मचारी कार्यरत आहेत.

सोबतच्या तक्त्यात नमुद राष्ट्रीय आरोग्य अभियान (एन.यु.एच.एम./आर.सी.एच.), एन.टी.ई.पी. (राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरन कार्यक्रम) कर्मचा-यांना मा.महापौर साहेब यांचे निर्देशानुसार एन.टी.ई.पी. (राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरन कार्यक्रम) ची मंजुर १७ कंत्राटी पदे व राष्ट्रीय आरोग्य अभियान (एन.यु.एच.एम./आर.सी. एच.) ची मंजुर ६२ कंत्राटी पदे असे एकुण ७९ पदांची निर्मिती करणे व सध्याच्या कार्यरत कर्मचा-यांना मनपाच्या कायम सेवेमध्ये सदर नवीन निर्मित पदावर सामावुन घेणेकामी मा.महासभेपुढे ठराव मान्य करुन मा.शासनाकडे मंजुर ठरावाचा प्रस्ताव पाठवुन नविन पद निर्मिती करुन सध्या कार्यरत कर्मचा-यांना सदर पदावर सामावुन घेण्याची कार्यवाही मनपाच्या आस्थापना विभागा मार्फत करणे उचीत राहील.

तरी अहमदनगर महानगरपालिके अंतर्गत राष्ट्रीय आरोग्य अभियान (एन.यु.एच.एम./आर.सी.एच.), एन.टी.ई.पी. (राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरन कार्यक्रम) मधील कंत्राटी कर्मचा-यांना मनपाच्या कायम स्वरुपी सेवेमध्ये सामावुन घेणेकामी प्रस्ताव मा.महासभेपुढे अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविणेसाठी महासभेच्या निर्णयासाठी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

---*---

**चर्चा :-**

**मा.श्री.मनोज कोतकर :-** २१ नंबर विषयावर बोलतो. कोरोनाच्या काळात कोणीच कोणाला मदत करत नव्हते. अशी परिस्थित असतांना आरोग्य सेवकाने स्वॅब घ्यायचे काम केले. लस सकाळी ९.०० ते ६.०० पर्यंत देण्याचे काम केले. आरोग्य सेवकांना कायम करण्याचा विषय याठिकाणी आला या सेविकांना नक्की परमनंट करु शकतो का. हा अधिकार महासभेला आहे का.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** वशीला वगैरे न करता अत्यंत कठीण काळात त्यांनी काम केले. त्यामुळे सर्वांना सेवेमध्ये सामावुन घ्यावे वशीला वगैरे करु नये अशी मी विनंती करतो. कोणावर अन्याय होणार नाही. या पध्दतीने काम करावे.

**मा.सौ.सुपिया जाधव :-** २१ नंबर बाबत बिंदुनामावली शासनाकडे पाठवावे सर्व कायदेशीर बाबी तपासून शासनाकडे पाठवावे जेणेकरुन प्रशासन अडचणीत येणार नाही.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** प्रस्ताव फक्त अवलोकनार्थ पाठवला आहे. मा.वाकळे साहेबांनी जे बोलले त्या पध्दतीने सर्व कर्मचा-यांनी जीवावर उदार होवून काम केलेले आहे. अधिका-यांनी नावे सुचवायचे व त्यांचे नाव घ्यायचे असे होता कामा नये. चांगल्या काम करणा-या कर्मचा-याला बाहेर टाकतात जो विषय आहे त्यास सर्वांची मंजूरी आहे. महाराष्ट्र शासन पगार देत असेल आपण देत नसू तर सर्वांना घ्या.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** १७ पदे भरायची आहेत. आर.सी.एच.ची ६२ पदे भरायची आहेत. हा प्रस्ताव आस्थापना कडून आला असायला पाहीजे होते. आपण आज ठराव मंजूर करणार प्रशासन आस्थापना त्याची अंमलबजावणी करील का. आयुक्तांनी सांगावे आम्ही यात न्याय देणार. नगरविकास खात्याचे निर्देश आहेत. ३ जून २०२१ रोजीचे पत्र आहे. ते पत्र वाचून दाखविले. राजुरकर डॉक्टरांनी १७ व ६२ पदच घेतली कोव्हीड काळात इतर कर्मचारी काम करत होते त्यांना सामावून घेतले का. फक्त डॉक्टर परिचारीका घेतले त्यांनाही रिलीफ मिळाला पाहीजे.

**आरोग्य अधिकारी डॉ.श्री.राजुरकर :-** एनयुएचएम एकुण ७९ पद कार्यरत आहेत. त्या कर्मचा-यांचे ठेवले आहे. शासनाचे जे पत्र आपण दाखवले ते आले आहे.कोव्हीड हॉस्पीटल नाही. कोव्हीड केअर सेंटर आहे. डायरेक्ट संपर्कात कर्मचारी येत नाही १ वर्ष सुध्दा कालावधी पूर्ण झालेला नाही त्यांना घेता येत नाही. स्थानीक पातळवर ठरवायचे आहे. इतर महानगरपालिकेने असा कुठलाही निर्णय घेतलेला नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** डॉक्टर परिचारीका कोव्हीड काळात ज्यांनी सहभाग घेतला त्या सर्वांना समाविष्ठ करुन घ्यावे.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** कर्मचा-यांना स्पष्टीकरण दिले तर त्यांच्या लक्षात येईल. फक्त महानगरपालिकेची मंजूरी घेवून नाहीतर शासनाची मंजूरी लागेल. आयुक्तांनी थोडा पाठपुरावा केला तर

नक्कीच ते कायम होती. कोरोना काळात दिवसभर काम करुन घरी गेल्यानंतर मुलाला जवळ घेत नव्हत्या. त्या लोकांना स्पष्टीकरण दिले तर बरे होईल. सर्वांनी पाठपुरावा करावा.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** कोव्हीड काळात जीव धोक्यात घालून काम केले आहे. ६२ व ७९ मधून राहीलेल्यांचा जरुन विचार झाला पाहीजे एक दिवस जरी काम केले तरी कोव्हीड संपर्कात येवून त्यांनी जीव धोक्यात घातला आहे. त्यांचे लक्ष लागलेले आहे. राहीलेल्यांचा समावेश करुन घ्यावा.

**मा.सौ.लता शेळके :-** आरोग्य विभागाचे कर्मचारी १०-१५ वर्षापासून काम करतात त्यांना मंजूरी द्यावी. दोन वर्षापासून कोरोना काळात त्यांनी जीव धोक्यात घालून काम केले त्यामुळे त्यांना कायम करावे हि विनंती. शासनाकडे प्रस्ताव मांडावा.

**आरोग्य अधिकारी डॉ.श्री.राजुरकर :-** ७९ पदे मंजूर आहेत. १० वर्ष सेवा - १३, ७ वर्षापेक्षा जास्त - ३१, ३ वर्षापेक्षा जास्त - १२, ३ खाली १५ आहेत. सन २००६ मध्ये अर्बन आरसीएच कार्यक्रम मंजूर झाला त्या अनुदानातुन ३ आरोग्य केंद्र बांधले सर्व आरोग्य केंद्रात माता बाल संगोपन स्कीम अंतर्गत कंत्राटी सेवा देतात. त्याठिकाणी महानगरपालिकेचा स्टाफ तुरळक आहे. इतर महानगरपालिकांत आरसीएच स्कीत अंतर्गत जे कर्मचारी कार्यरत आहेत त्याबाबत माहिती घेतली. भिंवडी महानगरपालिकेत सन २००७ साली - ४० पदांना मंजूरी, मालेगांव महानगरपालिका - ३० पदांना मंजूरी दिली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका - ५० पदांबाबत निर्णय प्रलंबित, मालेगांव महानगरपालिकेत ३० पदे शासनाने मान्य केली. त्यावेळी ३५ टक्के खर्चाची मर्यादा शिथील केली आहे. आत्ताचा प्रस्ताव नविन पद निर्मिती बाबत आहे. आरसीएच अंतर्गत २२ कर्मचारी जुने आहेत. त्या पदावर सामावुन घेणे असा विषय आहे. आरसीएच कर्मचा-यांपैकी १७ कर्मचारी यांनी कोर्टात केस दाखल केली आहे. ४ गेलेले नाहीत. हे जास्त वर्ष सर्व्हीस करतात. २१ कर्मचारी जुने आहेत. २१ कर्मचा-यांना आस्थापना सुचीवर घेण्यासाठी सन २०१७ साली प्रस्ताव दिला होता. परंतु आस्थापना खर्च जास्त असल्याने पद मंजूरीस शासनाने नकार दिला त्यामुळे आता दुस-यांदा प्रयत्न करीत आहोत.

**मा.श्री.अविनाश घुले :-** इंजिनियर्स टेक्नीशीयन पदे थोडी आहेत. याबाबतीत काही लक्ष देणार आहोत की नाही. स्पेशल केस म्हणुन मंजूर करुन आणायला पाहीजे. महापौर उपमहापौर आयुक्त असतील आपण दखल घेणार आहोत की नाही. काही रिटायर होणार काहींना व्हीआरएस घ्यायची आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** महानगरपालिकेचा स्टॅपिंग पॅटर्न २०१६ ला मंजूर झाला. २९०० पदे मंजूर आहेत. त्यापैकी १७०० कार्यरत आहेत. त्यातील काही पदे तांत्रिक आहेत. महानगरपालिकेने यापूर्वी ब-याचवेळा प्रस्ताव पाठवले पण आस्थापना खर्चामुळे नविन पदे भरता येत नाही. वरची पदे जी आहेत ती डेप्युटेशनवर मागणी करा असे सांगीतले आहे. त्यानुसार कारवाई केली आहे. प्रतिनियुक्तीची पदे मागत आहोत. काही खर्च कमी करुन आराखडा सादर केला आहे. पुढच्या आठवडयात मी मुंबईला जाणार आहे.

आरसीएच पद भरता येतील का ? दोन योजनांमध्ये पद महानगरपालिकेत कार्यरत आहेत. एनयुएचएम./आरसीएच,एनटीईपी अशी एकुण ७९ पदे मंजूर आहेत. ही पदे महानगरपालिकेमार्फत भरण्याची शासनाने नव्याने तरतुद केली आहे. यापुर्वी पद भरती साठी दोन तीन वेळा जाहीरात काढली. काही पदे कंत्राटी पध्दतीने भरली आहेत. १४७ ते १५० पदे आहेत. एनयुएचएम मध्ये पैसे वापरायला परवानगी दिली होती. कोरोनाची तिसरी लाट येईल म्हणुन आपण काही पदे ठेवलेली आहेत. महानगरपालिकेकडे ही पदे एनयुएचएम अंतर्गत कार्यरत आहेत. १ महिन्यात ठराव करुन पाठवावा लागेल. या पदांना नगरविकास विभागाकडून महानगरपालिकेच्या आस्थापनावर मंजूरी घ्यावी लागेल. त्या पदाचे समावेशन करावे लागेल तो खर्च

एनयुएचएम मधुन मिळावा. समावेशन करण्यासाठी एनयुएचएमकडे पाठवायचा व पदनिर्मितीचा नगरविकास विभागाकडे पाठवायचा आहे. रिक्त पद भरण्याची ७-८ दिवसात कारवाई करु. दोन्ही पद मंजूरीचा आपल्याला समावेश करावा लागेल.

**मा.श्री.अविनाश घुले :-** काही परिचारीकांनी माझ्याकडे पत्र दिले. ६ वर्षे झाली, १० वर्षे झाली काम करीत आहोत. मानधनावर आहोत. त्यांना एक रुपया वाढ नाही. काहीतरी टक्केवारीत वाढ करण्याचे धोरण याठिकाणी ठरवावे लागेल. स्थायी समितीकडे १०९ पदांचा प्रस्ताव आला. त्यात बिगारी यांना ५०० रुपये वेतन आहे. रजपुत सिस्टर, क्षेत्रे सिस्टर यांना २४ वर्षे झाली त्यांना १३ हजार रुपये पगार आहे असे का ? धोरण ठरवावे काहीतरी मानधन वाढवून द्यावे.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** श्रीमती.पल्लवी दगडू मोरे या महानगरपालिकेत ब-याच वर्षेपासुन काम करीत आहेत. त्यांचे देखील या प्रस्तावात नांव घेण्यांत यावे.

**मा.आयुक्त साहेब :-** माताबाल संगोपन मध्ये भरलेला स्टाफ दुसरा महानगरपालिका दवाखान्यात काम करतात. पहिली योजना सेवेतुन काढणे, सुप्रीम कोर्टात केस चालू आहे. त्यांची मागणी मानधन वाढुन द्यावे. दुसरी मागणी - त्यांना मानधन वाढवले नाही. मी १०० टक्के चांगली शिफारस करतो योग्य तो निर्णय घेवू. दोन सिस्टर कोर्टात आहेत. त्यांची माहिती घेवून बोलतो नंतर आता काही बोलत नाही.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** टोकीओ ऑलंपिक स्पर्धांमध्ये गोल्ड व सिल्व्हर मेडल मिळवलेल्या सर्व खेळाडुंनी भारताचे नांव उज्वल केले. त्या सर्व पदक विजेत्या खेळाडूंच्या अभिनंदनाचा ठराव याठिकाणी मांडते.

**मा.महापौर साहेब :-** आस्थापना विभागाने प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविण्यास ही सभा मान्यता देत आहे.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट व महासभेत मा.सदस्यांनी केलेली साधक बाधक चर्चा पाहता अहमदनगर महानगरपालिके अंतर्गत राष्ट्रीय आरोग्य अभियान (एन. यु. एच. एम. / आर.सी.एच.) एन.टी.ई.पी (राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरन कार्यक्रम) मधील कंत्राटी कर्मचारी तसेच कोव्हीड काळात महानगरपालिकेत कंत्राटी पध्दतीने सेवा दिलेल्या सर्व कर्मचा-यांसह श्रीमती.पल्लवी दगडू मोरे यांना कायम स्वरुपी सेवेमध्ये सामावुन घेणेकामी प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी. तसेच सदर पदांना मंजूरी घेणे कामी आस्थापना विभागाने संबंधित विभागाकडून कंत्राटीपध्दतीने काम केलेल्या सर्व कर्मचा-यांची यादी प्राप्त करुन त्यावर सविस्तर प्रस्ताव तयार करुन मा.शासनाकडेस प्रस्ताव मंजूरीसाठी पाठविण्यांस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.अनिल माधवराव शिंदे,

अनुमोदक :- मा.श्री.अविनाश हरीभाऊ घुले,

सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०३** **प्रस्ताव क्रमांक : २२** **दिनांक:- १२/०८/२०२१**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इमारत व जमिनीचे पुनर्मुल्यांकन करणे बाबत..

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**वाचा :-** १) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची "ड" प्रकरण ८ कराधान नियम ७

२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची "ड" प्रकरण ८ कराधान नियम २१

३) नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण -२०१५/प्र.क्र.१५७/नवि-३३ मंत्रालय, मुंबई दिनांक २० जुलै २०१५.

४) नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एनयुएलएम-२०१७/प्र.क्र.४/नवि-२० मंत्रालय, मुंबई दिनांक १२ जुन २०१७.

५) नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे पत्र क्रमांक नपप्रसं-२२०/सर्वनप/मा.कर मुल्य/ प्र.क्र.६५/कक्ष १०(६) मुंबई दिनांक ०९ ऑक्टोंबर २०२०.

अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इमारत व जमिनीचे पुनर्मुल्यांकन सन २००२-२००३ या आर्थिक वर्षात तत्कालीन नगरपरिषद असतांना करण्यात आले होते. त्यावेळेस एकुण ७६,००० इमारत व जमिनीचे पुनर्मुल्यांकन करुन कर आकारणी निश्चित करण्यात आली होती.

तत्कालीन नगरपरिषदेचे दिनांक ३० जून २००३ रोजी अहमदनगर महानगरपालिकेत रुपांतर झालेले आहे. महानगरपालिका स्थापन झाल्यापासुन अधिनियमातील अनुसूची "ड" प्रकरण ८ कराधान नियम २१ (२) नुसार दर पाच वर्षातुन निदान एकदा तरी नविन आकारणी पुस्तक तयार करण्यात आले पाहिजे, अशी तरतुद आहे. परंतु महानगरपालिका स्थापन झाल्यापासुन इमारत व जमिनीचे पुनर्मुल्यांकन झालेले नाही. पण इमारत व जमिनीचे ज्या इमारती बांधून पुर्ण झालेल्या आहेत, त्या - त्या वर्षात मोजमापे घेवुन मालमत्ता कराची आकारणी केलेली आहे व नगररचना विभागाकडुन अंतिम मंजूरी झाल्यानंतर प्रत्येक वर्षी भुखंडाची कर आकारणी करण्यात आली आहे. त्यामुळे सद्यस्थितीत ४१ हजार मालमत्ता कराची आकारणी करण्यांत आलेली आहे.

सन २०१२ मध्ये महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांचे जी.आय.एस.आधारीत सर्व्हेक्षण व मॅपिंग करण्यासाठी निविदा पध्दतीने मे.स्ट्रेसालाईट, मलकत्ता या कंपनीस मालमत्तांचे पुनर्मुल्यांकन करण्याचे कामकाज देण्यांत आलेले होते. परंतू दिलेल्या मुदतीत व वेळोवेळी दिलेली वाढीव मुदत देवुनही सदर कंपनीने मालमत्तांचे पुनर्मुल्यांकनाचे काम पुर्ण केलेले नसल्याने सन २०१९ या वर्षात सदर कंपनीचे कामकाज काढुन घेतलेले आहे. त्यामुळे मालमत्तांची जी.आय.एस.आधारीत सर्व्हेक्षणाचे काम पुर्ण झालेले नाही.

अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इमारती व जमिनीचे कर आकारणीसाठी वाजवी वार्षिक भाडे मुल्याचे एकुण पाच उप विभाग (झोन) तयार करण्यात आलेले आहे. त्यानुसार उपविभागातील (झोन) मालमत्तांचे वाजवी वार्षिक भाडे मुल्य दर निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानुसार अद्यापपर्यंत मालमत्तांची

कर आकारणी करण्यांत येत आहे. सोबत मालमत्ता कराची आकारणी करीता प्रस्तावित केलेले झोन निहाय मासिक भाडे तक्ता जोडला आहे. सदरचे दर हे सन २००५ मध्ये तयार करण्यात आलेले आहे. त्यावेळेसची महागाई पाहता त्यानुसार मालमत्तांचे वाजवी वार्षिक भाडे मुल्य निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानुसार आजमितीस महागाई मध्ये वाढ झाली असल्यामुळे प्रस्तावित केलेले वाजवी वार्षिक भाडे मुल्यात तीन पट वाढ करणे आवश्यक आहे.

मालमत्ता कराचे प्रत्येक वर्षी सर्वसाधारण पणे ५० ते ५५ कोटी रुपये उत्पन्न मिळत आहे. ते उत्पन्न महानगरपालिका करत असलेले विकास कामांना अतिशय कमी पडत आहे. त्यामुळे दरवर्षी देय रक्कमेचा आकडा वाढत आहे. आजमितीस महानगरपालिकेस आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे.

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मालमत्तांचे सर्व्हेक्षण करण्यासाठी जी.आय.एस.मॅपिंग प्रणालीची अंमलबजावणी करणेसाठी भारतात विविध कंपन्या काम करीत आहे. त्यासाठी निविदा मागविणे आवश्यक आहे. त्यावर खर्च होणार आहे. तसेच जी.आय.एस.प्रणालीवर आधारित मालमत्ता आकारणी करण्याची कर प्रणाली योजना, योजनांतर्गत योजना म्हणुन पुढील प्रमाणे राबविण्यात येईल.

०१. महानगरपालिका कार्यक्षेत्राचे जी.आय.एस.प्रणाली आधारीत नकाशे नगररचना विभागाने उपलब्ध करुन देणे.
०२. सदर नकाशावरुन संस्करण करणे.
०३. संस्करणानुसार नकाशावर आधारित घर निहाय प्रत्यक्ष सर्व्हेक्षण करणे.
०४. सर्व्हेक्षणाअंती माहिती संचाचे (Data Base) संकलन व संस्करण करणे.
०५. वेब बेस्ड ऑनलाईन प्रणाली व ॲप विकसित करणे.
०६. घर निहाय प्रत्येक सर्व्हेक्षणाच्या तपशिला पैकी १५ % तपशिलाचा त्रयस्थ संस्थेकडुन तपासणी करणे.
०७. उपरोक्त (१) ते (६) अनुसार कार्यवाही झाल्यानंतर अधिनियम / नियमातील तरतुदीनुसार विहित कार्यपध्दती अनुसरुन प्रत्यक्ष मालमत्ता कराची आकारणी करणे.

मालमत्तांचे सर्व्हेक्षण करणेसाठी जी.आय.एस.मॅपिंग प्रणाली लागू करणे तसेच मालमत्तांचे वाजवी वार्षिक भाडे मुल्य दरात तीन पटीने वाढ करणेबाबतचा विषय मा.महासभेपुढे ठेवणे विषयी व येणा-या खर्चास व प्रशासकीय मान्यतेसाठी आदेशार्थ सादर.

यावर सहा.आयुक्त (कर) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित केल्याप्रमाणे पुढील कार्यवाहीस्तव तथा आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, मा.G.B. समोर निर्णयार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

---*---

**चर्चा :-**

विषय क्रमांक २२ चे वाचन करण्यांत आले.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** सद्यस्थितीत ४१ हजार मालमत्ता करावर २० टक्के कर आकारणी करतो. या अगोदर ज्या संस्थेला काम दिले त्या संस्थेने अर्धवट काम सोडून दिले. मालमत्ता कराचे रीव्हीजन करायचे आहे. अंदाजे ८०,००० इमारती ३५००० प्लॉट रिव्हीजन झाले नाही. ४१००० मिळकतीचे वाढीव बांधकाम

झाले आहे त्याचेही रिव्हीजन झाले नाही. पुर्वीच्या मालमत्ता धारकाने घर पाडून स्लॅबचे बांधले त्याचे रिव्हीजन झाले नाही. ७०० सफाई कर्मचारी सोडल्यानंतर १६०० कर्मचारी आपल्याकडे आहेत. प्रभाग निहाय प्रत्येक गोष्टीची माहिती आहे. जीपीएस प्रणाली व्दारे रिव्हीजन करायचे या मताशी सहमत आहे पण यावर खर्च होणार आहे. पगार होत नाही. लाईट बील देता येत नाही. वर्षाला जीएसटी ६ कोटी येतात दर महिन्याला १२ कोटी खर्च येतो. आम्हाला निधी मिळत नाही. निधी मिळाला तर ठेकेदार तयार होत नाही. वाढीव दर लावायला माझा विरोध आहे. रिव्हीजनला माझा विरोध नाही. किती नळ कनेक्शन बोगस आहेत. ८० हजार मिळकती आहेत फौजदारी गुन्हा दाखल करावा अनधिकृत नळ कनेक्शन असणा-यांवर. ३० हजार लोकां कडून पाणी पट्टी घेतो. उर्वरीत ५० हजारावर कारवाई करीत नाही. याचे सर्व्हेक्षण करा. आज आपल्याला पाणीपट्टीतुन वार्षिक ११ कोटी मिळतात. दोन्ही मिळून ६५ कोटी मिळतात. आम्हाला काय विकास निधी देणार. आपले कर्मचारी नेमा. रिव्हीजन आत्तापर्यंत झाले नाही. सर्व्हेक्षण व्यवस्थीत झालेले नाही. आम्ही १ रु. वाढवून देणार नाही. मुळाडॅम मेन लाईनवरुन किती लोकांनी कनेक्शन घेतले १२ गावांना पणी दिले जाते. कोण किती काम करते ते तपासा कितीतरी लोक सह्या करुन घरी जातात. महानगरपालिकेच्या लोकांकडून किती इमारती आहेत याचे सर्व्हेक्षण करा. खाजगी संस्थेला १० कोटी लागतील.

पुनर्विलोकन वाढविण्या बाबतीत

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** भारतीय जनता पक्षाच्या वतीने कुठलाही कर वाढविण्यास विरोध नोंदवीत आहे. पाणी योजना पूर्ण क्षमतेने घेवू द्या. आता कोणतीही कर वाढ करु नये.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** पुनर्मुल्यांकन करण्यास हरकत नाही पण करवाढ करु नये. मागच्या वेळी खाजगी संस्थेला काम दिले त्यांचे कर्मचारी पैसे घ्यायचे आपल्या कर्मचा-यांकडून रिव्हीजनचे काम करण्यांत यावे.

१२ जुलै २०२१ ला प्रसिध्दी विभागाने अनधिकृत नळ कनेक्शन बाबतीत निवेदन दिले आपण जे फेज - २ वरुन कनेक्शन घेतले त्यांना अनधिकृत करणार का ? फेज-२ च्या लाईनवर परत कनेक्शन घेतले तर अनधिकृत ठरणार का.

**मा.आयुक्त साहेब :-** आपल्याकडे फेज-२ परस्पर घेतले ते रेग्युलराईज करुन घेण्यात यावे. नोंद आपल्याकडे नाही. त्यांची नोंद घ्यावी.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** नगर शहराच्या नागरिकांना असे आपण काय दिले की, आपण करवाढीचा प्रस्ताव ठेवला कोरोनाने अनेकांचे कंबरडे मोडले आहे. सामान्य नागरीक दवाखान्याचे पैसे भरतांना मेटाकुटीस आले आहेत. असे असतांना ३ पटीने वाढीचा प्रस्ताव ठेवला अनेक दिवस पाणी येत नाही रस्त्याची दुरावस्था झाली आहे. बल्ब टयुब बसवू शकत नाही.

पुनर्विलोकनांस कुठल्याही सभासदाचा विरोध नाही. प्रशासनाची चूक आहे दर पाच वर्षांनी मुल्यांकन व्हायला पाहीजे २० वर्षात मुल्यांकन न झाल्याने या झालेल्या मोठया नुकसानीस जबाबदार प्रशासन आहे. कर वाढीचे उत्पन्नाचे इतर स्त्रोत आपण निर्माण करावे. पुनर्मुल्यांकन २० वर्षाने होते आहे. काटेकोरपणे कसे होईल ते पहावे. सक्षम अधिका-याची या करीता नियुक्ती करावी. प्रत्येक ठिकाणी प्रायव्हेटायझेशन करायचे तर आपल्या कर्मचा-यांकडे काहीच काम शिल्लक राहणार नाही. मग आपल्या कर्मचा-यांकडून काय काम करुन घ्यायचे.

करवाढीस राष्ट्रवादी कॉंग्रेसचा विरोध नोंदवावा. पुनर्मुल्यांकन करा.

**मा.सौ.रुपाली वारे :-** सावेडी भागात ९ रु.पट्टी आकारता, वेगवेगळे दर का, केडगांव भागामध्ये ४ रु आहे. सन २००५-२००६ मध्ये शहराचे झोनिंग केले होते. पूर्वी चे दर फायनल केलेले आहेत. दराबाबत माहिती दिली. त्यावेळचे जमिनीचे व्यवहार, भाडयाने दिलेले पासुन मिळणारे उत्पन्न यावर निश्चीत केले. प्रभाग समिती क्रमांक १ कडून जास्तीची वसुली होते. विकास निधीही त्या प्रमाणात मिळाला पाहीजे.

**उपायुक्त श्री.डांगे :-** घरपट्टी मागणी ३० कोटी आहे. १० कोटी पाणीपट्टी, चालू मागणी ४५ कोटी थकबाकी १५० कोटी, महानगरपालिका चालवायला महिन्याला १२ कोटी आले पाहीजे. मागच्या बजेट मिटींग मध्ये उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याची चर्चा झाली. इतर महानगरपालिकेत मोठे जास्त रेट आहेत. २००२, २००३ ला रिव्हीजन केली. मागील रिव्हीजनला २० वर्षे झाली. १०० कोटीचा गॅप आहे. उत्पन्न वाढीसाठी काही केले पाहीजे.

**मा.सौ.रुपाली वारे :-** सावेडी भागात सुविधा भेटत नसेल तर लोक कर कसा भरणार.

**उपायुक्त (सा) श्री.डांगे :-** कमीजास्त प्रमाणात सुविधा मिळते. मिळत नाही असे म्हणता येत नाही. शासकीय योजनात आपला हिस्सा असणे महत्वाचे आहे. त्याकरीता रक्कम लागेल. रिव्हीजन केले पाहीजे. कर्मचा-यां मार्फत केले पाहीजे. स्कीलचे काम आहे. त्यामुळे प्रायव्हेट एजन्सीकडून केले तर बरे होईल.

**मा.सौ.रुपाली वारे :-** करवाढीला आमचा विरोध आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** रिव्हीजनमध्ये काय काम करणार.

**उपायुक्त (सा) श्री.डांगे :-** जीपीएस इमेज काढली, जाणार घर निहाय सर्व्हे करणार, मोजमाप होणार आरव्ही ठरेल १०% वजा करुन घरपट्टी ठरेल प्रत्यक्ष घराला भेटी देणार संपूर्ण घर मोजणार हॉल कितीचा, बेड कितीचा सर्व मोजून कॉम्प्यटरायझेशन करुन तुम्ही जो आता रेट ठरवणार त्यानुसार आकारणी होईल.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** भाडेकरी असेल तर त्याला कमर्शियल पट्टी लावणार का.

**उपायुक्त (सा) श्री.डांगे :-** स्थळ पाहणी केल्यानंतर भाडेकरु जो भाडे सांगेल त्याची नोंदणी करणार

**मा.श्री.कुमार वाकळे :-** जे आपल्याकडे कर्मचारी आहेत त्यांना माहिती आहेत कोणाकडे भाडेकरी आहेत कोणाकडे नाहीत. रेट वाढवण्या पेक्षा मालमत्ता जर व्यवस्थीत केली तर कर मिळू शकतो आपले कर्मचारी वर्षाला जावून हप्ता घेतात.

**उपायुक्त (सा) श्री.डांगे :-** म्हणून तर आपण खाजगी एजन्सीकडून करुन घेणार आहोत.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** खाजगी माणसा मार्फत करतांना त्यांच्या सोबत आपला केअर टेकर द्या. त्यांना सर्व घरांची माहिती असते. आता सुध्दा जो कर्मचारी नोंद लावणार नाही, त्यांचेवर कार्यवाही करा.

**उपायुक्त (सा) श्री.डांगे :-** ट्रायल बेसीस वर आपण करुन घेवू.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** कर्मचारी रिशॅपल करा व वसुलीचे झोन वाईज बदला सगळयांची ओळख परेड घ्या.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** भटके कुत्रे पकडणारांची वर्क ऑर्डर दिली. त्यांनी कुठे सोडायचे त्यावर काहीतरी करावे लागेल. निर्बिजीकरण केलेले कुत्रे चावणारे असेल तर त्यास पुढे काय करणार. रेबीज झालेल्या कुत्र्याला इंजेक्शन देता येत नाही.

**उपायुक्त (सा) श्री.डांगे :-** ॲन्टीरेबीज इंजेक्शन द्यावे लागेल.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** मागच्या पंचवार्षीक ९-१० केसेस कुत्रे चावून मेलेले आहेत. त्या कुत्र्यांना रेबीज नाहीत, पण चावणारे आहेत त्यावर काय करणार. निर्बिजीकरण केल्यावर कुत्रे जास्त ॲग्रेसीव्ह होतात.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** आम्हाला नगरसेवक म्हणून हा विषय घ्यायची लाज वाटते. दर सभेस याच विषयावर चर्चा होते त्यावर ठोस निर्णय घ्या.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** सर्व्हेक्षण झालेच पाहीजे. सर्व सदस्यांचे वतीने भाडेदर तीन पट वाढविण्यास मी शिवसेनेच्या वतीने व सभागृहाच्या वतीने विरोध करते. अशा काळात घरपट्टी वाढवू नये पाण्याची अडचण आहे. त्याला नामंजूर करा. सर्वेक्षण जमिनीचे इमारतीचे त्याला मंजूर करावे.

**मा.श्री.अविनाश घुले :-** मागे जीपीएस सर्व्हेचे जे काम दिले त्याची माहिती घ्या.

**श्री.अंबादास साळी :-** १ कोटी ५२ लाख २०१७ मध्ये काम दिले. ३० हजार प्रॉपर्टी सर्व्हे केला.

**मा.श्री.अविनाश घुले :-** तो बरोबर होता.

**श्री.अंबादास साळी :-** सर्वे रिव्हीजन विभागाशी निगडीत होता.

**रिव्हीजन विभाग श्री.चाफे :-** जीपीएस सर्व्हे झाल्यानंतर ५० हजार प्रॉपर्टी फॉर्म रिव्हीजन विभागाकडे जमा झाले. तपासणी पुर्ण होवून ५२२६ तपासून झाले. ब-याचशा फॉर्म मध्ये त्रुटी आढळून आल्या. ब-याचशा नागरिकांच्या तक्रारी आल्या त्यामुळे त्यांचे काम थांबविण्यांत आले.

**मा.श्री.अविनाश घुले :-** पहिले पाढे पंचावन्न असे व्हायला नको. ते कंपनीचे आर्थिक तडजोडी करायचे बोगस काम केले तो कडू अनुभव लक्षात घेता त्यामुळे आता पुढे काम करतांना आपले कंट्रोलिंग आवश्यक आहे. त्रयस्थ कंपनीकडून ते करुन घ्यावे. एखाद्या झोनचे काम पहावे मग पुढचे ठरवावे.

**उपायुक्त श्री.डांगे :-** प्रत्येक ५ वर्षांत रिव्हीजन झाले पाहीजे.

**मा.श्री.अविनाश घुले :-** मग आत्तापर्यंत का झाले नाही. उत्पन्नाच्या एवढया महत्वाच्या बाबी असतांना का झाले नाही. वेळच्यावेळी झाले असते तर सभागृहात बोलायची वेळ आली नसती. याला कोण जबाबदार आहे.

**उपायुक्त श्री.डांगे :-** मागे झालेल्या चूका दुरुस्त करायच्या आहेत.

**मा.श्री.अविनाश घुले :-** स्थायी समिती अर्थसंकल्पीय सभेस काही लेखाशिर्षकामध्ये प्रयत्न केल्यास वाढ होवू शकते. उत्पन्नाच्या स्त्रोतावर कोणती कारवाई करण्यांत आली. उत्पन्न वाढी बाबत एक अधिकारी माझ्याकडे चर्चे करीता आला नाही. पाणीपुरवठा मिटींग नंतर बोगस कनेक्शन बाबती त जाहीरात करणे गरजेचे आहे. अजुन नागरीकांपर्यंत गेलेला नाही. घंटागाडी मार्फत नागरिकांना अवाहन करावे. नागरिकांनी २२०० रुपय्र भरुन कनेक्शन घेतो. फेज-२ परत कनेक्शन घेतांना लोकांनी काय करायचे.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** सभागृहाने धोरण ठरविले. फेज-२ च्या ठिकाणी कनेक्शन जरी असेल तरी महानगरपालिकेच्या एजन्सीने ठरविलेली रक्कम भरावी लागणार. तेथे ऑलरेडी फेज-२ कनेक्शन घेणे क्रमप्राप्त नाही. त्यांना रेग्युलराईजच करुन घ्यावे लागणार.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** अनधिकृत कडून ४२०० रुपये कसे घेतात.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** माझे जरी जुन्या लाईनवर कनेक्शन आहे तरी मला फेज-२ वर नविन कनेक्शन घेतांना, ठरवलेले कनेक्शनचे पैसे भरावे लागतील.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** आपल्या ड्रेनेजलाईन, पाईपलाईन, रस्त्याचे कामाचे वेळी महानगरपालिके मार्फतच रस्त्याची नुकसान होवू नये म्हणून कनेक्शन जोडून घेण्यांस सांगण्यांत आले होते. त्यामुळे वॉर्डातील नागरिकांनी कनेक्शन घेतले आहेत. त्यामुळे फेज-२ ज्यांनी कनेक्शन घेतले त्यांचेकडून दंड आकारणी करु नये.

**मा.आयुक्त साहेब :-** सभागृहाला फेर धोरण ठरवावे लागेल. सभागृहाकडून जर सूचना आल्या तर प्रशासन विचार करेल.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** रुलिंग द्या.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** ६० हजार कनेक्शन फेज-२ वर यायचे आहेत. ते जर माफ करायचे झाली तर ती किती रक्कम होईल. महानगरपालिका आकारत असलेली रक्कम दंड नाही. ती नविन कनेक्शन घेण्यासाठीची रक्कम आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** दंड कॅन्सल करु.

**मा.महापौर साहेब :-** दंड कॅन्सल करु.

**मा.श्री.अविनाश घुले :-** बिगर शेती करतांना टॅक्स लावणे अपेक्षित आहे. त्यांचेकडून कोणतेही शुल्क लागले जात नाही. असे निदर्शनास आले आहे.

**उपायुक्त श्री.डांगे :-** एन.ए टॅक्स तलाठी भरुन घेतो.

**इंजिनियर श्री.बल्लाळ :-** इथुन पुढे आयुक्तांनी वसुल करायचा आहे. ते पाहतो आहोत. कर निश्चित तेच करणार फक्त वसुल आपण करायचा.

**उपायुक्त श्री.डांगे :-** नविन महसुल संहिते मार्फत तलाठी सक्षम आहेत. शासनाला मार्गदर्शन सांगीतले आहे. नगरविकास विभागाचे मार्गदर्शन मागविले आहे. त्यानंतर कार्यवाही होईल. तलाठ्याने वसुल करणे अभिप्रेत आहे. आपलेच काम आपल्याला होत नाही.

**मा.श्री.अविनाश घुले :-** नविन वैद्यकीय व्यावसायीकांचा शोध घेवून बॉम्बे नर्सींग होम ॲक्ट पासुन मिळणा-या फी मध्ये वाढ करावी. महानगरपालिकेच्या मोक्याच्या जागा नेहरुमार्केट, एन.सी.सी.ऑफिस वरील जागा असेल पुढे प्रस्ताव तयार करु. असे प्रस्ताव तयार आहेत का.

**मा.आयुक्त साहेब :-** याबाबत दोन बैठका झाल्या. दोन तांत्रिक सल्लागार त्यांना दिले. ५ प्रोजेक्ट घेत आहोत. आराखडा तयार करण्यांस सांगितले आहे.

**मा.श्री.अविनाश घुले :-** गाळे हस्तांतर करण्याची प्रक्रीया प्रभावीपणे राबवावी. अनधिकृत बांधकाम नियमानुकूल करणे, मालमत्तांच्या नोंदी नाहीत. यासाठी ठोस निर्णय घ्यावा. गुंठेवारी, जाहीरात बोर्ड भाडे वाढ केल्यास उत्पन्नात वाढ होईल. यावर लक्ष द्यावे. भाडयाने दिलेल्या शाळा खोल्यांच्या थकबाकीदारांवर कडक कारवाई करावी. बंद असलेल्या शाळा खाजगी तत्वाने भाड्याने द्याव्यात, पे ॲण्ड पार्क अनधिकृतपणे चालू आहे. ते सुध्दा उत्पन्न वाढीचा स्त्रोत आहे. मोबाईल टॉवर प्रशासनाचे शुल्क, मोबाईल टॉवर दंडात्मक शुल्क यापासुन उत्पन्न मिळू शकते ते प्रशासनाने गंभीरपणे दखल घ्यावी. एकजीवाने काम केले तर नविन शहरात चांगला मॅसेज जाईल. कडक कारवाई करुन उत्पन्नात कशी भर पडेल यासाठी प्रशासनाने लवकरात लवकर कारवाई करावी.

**मा.सौ.कमल सप्रे :-** प्रस्ताव क्रमांक २२ भाडे मूल्य दरात तीन पटी दराबाबत मी बोलते. रेडीरेकनर दर ४ वर्षापासुन तेच ठेवले आहेत. लॉकडाउन, अनलॉकडाउनमुळे जनता भरडली आहे. ४१ हजार मालमत्ता आहेत. खाजगी सर्व्हेक्षण केले तरी ५० हजार मिळकती मिळतील.

राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीच्या वतीने विरोध, २००४-२००५ साली बांधकाम काम केले असेल तर त्या मिळकतींना आज आकारणी करतांना सन २००४-२००५ पासून कशी आकारणी करणार ?

**उपायुक्त (सा) श्री.डांगे :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये मागील सहा वर्षापर्यंत आकारणी करण्याची तरतुद आहे.

**मा.महापौर साहेब :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील इमारत व जमिनीचे जी.आय.एस.मॅपिंग प्रणाली मार्फत रिव्हीजन महानगरपालिका कर्मचारी मार्फत किंवा खाजगी एजन्सी मार्फत करणेस ही सभा मान्यता देत आहे. नव्याने रिव्हीजन केलेल्या सर्व इमारतींना कोणत्याही प्रकारचे नविन भाडे आकारणी न करता जुन्या दराप्रमाणे आकारणी करणेस ही सभा मान्यता देत आहे. प्रशासनाने याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

---*---

**ठराव :-**

अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांचे सर्व्हेक्षण करणेसाठी जी.आय.एस.मॅपिंग प्रणाली मार्फत सर्व्हे करण्यांस व येणा-या खर्चास तसेच अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांचे रिव्हीजन करण्यांस ही सभा मान्यता देत आहे. सदरचे रिव्हीजन, सदर कामाचा अनुभव असलेल्या खाजगी एजन्सी मार्फत करुन घेण्यांत यावे. नव्याने रिव्हीजन केलेल्या सर्व इमारतींना कोणत्याही प्रकारचे नविन भाडे आकारणी न करता जुन्या दराप्रमाणे आकारणी करणेस ही सभा मान्यता देत आहे. प्रशासनाने याबाबत योग्य ती कार्यवाही करावी. यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. अनिल माधवराव शिंदे,

अनुमोदक :- मा.श्री.कुमार बबनराव वाकळे,

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

---

**प्रस्तावाचा विषय :-** मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :**

1) सौ.आशा शिवाजीराव कराळे माझी तब्येत बरी नसल्याने दिनांक 19/10/2023 च्या सभेस उपस्थित राहू शकत नसलेबाबत रजेचा अर्ज मंजूर करणेबाबत...

2) सौ.लताबाई बलभिम शेळके माझी तब्येत बरी नसल्याने दिनांक 19/10/2023 च्या सभेस उपस्थित राहू शकत नसलेबाबत रजेचा अर्ज मंजूर करणेबाबत...

---*---

**ठराव :**

नोंद घेण्यांत येत आहे.

सुचक : मा.श्री.उमेश (गणेश) खंडेराव कवडे

अनुमोदक :मा.श्री.परसराम बाळु गायकवाड,

ठराव सर्वानुमताने मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**चर्चा :-**

**मा.श्री.गणेश कवडे :-** शहरातील गेल्या १ ते २ महिन्यापासून पाणी पुरवठा विस्कळीत झाला आहे. आपण सर्वांनी वेळोवेळी विळद डॅमला भेटी दिल्या. नगर शहरात पाणी पुरवठा विस्कळीत झालेला आहे. दिवसाआड पाणी देत असलो तरी दररोज का देवू शकत नाही. नागरिकांच्या रोषास सामोरे जावे लागते

आपण नेमके काय केले पाहीजे. संबंधित वॉलमन व फिटरला फोन करतो पण पाणी पुरवठा सुरळीत होत नाही. रोटेशन प्रमाणे कधी पाणी पुरवठा होईल.

**मा.श्री.अविनाश घुले :-** मा.महापौर व उपमहापौर यांचा पहिलाच जनरल बोर्ड आहे त्यांचा अभिनंदनाचा ठराव मी मांडतो.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** मा.अविनाश घुले यांनी जो ठराव मांडला त्यास मी अनुमोदन देत आहे.

मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** मागील दीड दोन महिन्यापूर्वी सभा झाली त्यात सारसनगरमध्ये घाण पाण्याच्या प्रश्ना बाबत पत्र दिले. त्यावर आयुक्तांनी शेरा मारला सारसनगर बरोबरच, स्टेशन भाग, टिळकरोड, भोसले आखाडा भाग असेल विभागामार्फत काम चालू आहे. परंतु त्याचा अजुन परिणाम झालेला दिसून येत नाही. घाण पाण्याचा प्रश्न अजुन मिटत नाही ताबडतोब घाण पाण्याचा प्रश्नासाठी जे काही करता येईल ते लवकर करुन प्रश्न मार्गी लावावा.

**मा.श्री.दत्तात्रय कावरे :-** सध्याची पाण्याची परिस्थिती अत्यंत खराब आहे. रोज वॉलमनला फोन करावा लागतो. सर्वांत महत्वाचा प्रश्न घाण पाण्याचा आहे. पाणी पुरवठा विभागाकडे कर्मचारी नाही. त्यांना कर्मचारी उपलब्ध करुन दिले पाहीजेत. ते उपलब्ध होत नाहीत. किती लेव्हल राहीली म्हणजे पाण्याला प्रेशर येईल.

**मा.श्री.गणेश कवडे :-** मी मागच्या पाणी पुरवठा विभागाच्या मिटींगमध्ये सांगीतले आमच्या भागात पाणी येत नाही. कर्मचारी पण नाहीत. २-४ लोकांवर काम चालू आहे. फेज-२ मुळे लाईन लिकेज झाल्या आहेत. पाणी वेळेवर येत नाही. पुर्ण दाबाने पाणी येत नाही. अंतर्गत काही हेवेदावे असतील तर नागरिकांना वेठीस धरु नका गेल्या दोन महिन्यापासुन गंमत पाहतो आहेत. तुम्ही पुर्वी प्रमाणे पाणी द्या कर्मचा-यांची नियुक्ती करा.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** खालच्या चुका जोपर्यंत प्रशासनाला सांगत नाही. तोपर्यंत सुधारणा होणार नाही. माझ्या प्रभागात बिल्डर लोकांनी घर बांधले. मी कर्मचारी यांना फोन केला. वसुलीच्या पावतीसाठी ते आठ दिवस कार्यालयात चकरा मारतात. त्यांच्या मागे लागावे लागते. त्या भागातील जे कर्मचारी आहेत ते कार्यालयात थांबत नाहीत. छळण्याचे कारण काय, उशीर करण्यामागे कारण काय आहे. खालचे कर्मचारी काम करीत नाहीत. काही लोकांकडे १०० भाडेकरी आहेत. त्यांना कमर्शिअल टॅक्स लावायला सांगतो पण ते करत नाहीत. नगरसेवकाचे नाव त्यांना सांगतात. पैसे भरुन कनेक्शन घ्यायला बिल्डर तयार आहेत. पण पैसे भरुन घेतले जात नाहीत. भालेराव नावाचा कर्मचारी आहे. त्याला मी मला प्रभागात नविन रोड करायचा आहे. कनेक्शन दे म्हणून सांगीतले पण त्याला प्रतिसाद दिला जात नाही. आपल्या लोकांनी पैसे भरुन घेतले नाही. तो माणूस चोर नाही. त्याला चोर करायचे पेन्सीलने दंडाची नोंद करायची व नंतर खोडून टाकायची असे केले जाते. सामान्य माणूस नोंद करायचा टाळतो कारण कर्मचा-यांची बाबूगिरी संपत नाही. त्रास देवून तो यायचा बंद होतो नंतर त्याला दंड आकारुन पट्टी आकारतो. बांधकाम परवानगी देतांना १५ मीटर रोड सात-बारावर असल्यास प्रत्यक्ष मोजणीमध्ये ७-८ मीटर भरतो. साईटवर काम करायला जातो तेव्हा प्रत्यक्षात तेवढी जमिन सापडत नाही. आम्ही तक्रार केली तर कर्मचारी म्हणतात आमचा तक्रार अर्ज लागेल. आज परवानगी देतांना ६-६, ९-९ मीटर जागेवर रस्ता भरत नाही. ३-४ मीटर रोड भरतो कसे काम करायचे. परवानगी देतांना रस्ता मोजून परवानगी दिली पाहीजे. ते कायमचे बांधकाम आहे. खालुन फाईल रेग्युलर गेली तर असे होणार नाही. नविन उपनगर वस्तीमध्ये वाढ होत आहे त्यांना शिस्त लावली पाहीजे. रस्ते, ड्रेनेज लाईन करायचे त्यावेळी तो माणूस बांधकाम कसा करणार. नगररचना विभागाकडील श्री.व्यापारी लिपीक यांना मी फोन केला त्यांनी मला

तुमचे पत्र लागेल असे सांगीतले. कर्मचारी चांगल काम करतो त्यांनाच युनिटमधुन काढुन टाकले जाते. अधिकारी निर्णय घेतात कोणी ठरवले ते काम करतात की नाही. आम्हाला विचारले पाहीजे कोण काम करते कोण नाही. काम न करणारे क्रीयाशील दाखवले जाते. मी प्रत्यक्षात साईटवर असतो या याद्या फायनल का झाल्या. काम करणारामुळे माहिती बाहेर जाईल त्यालाच काढुन टाकले जाते. नागापूर - बोल्हेगांव भागात ज्या परवानग्या दिल्या तेथे रोड मिळत नाही. आमचा अर्ज त्या बिल्डरला दाखवायला लागतो का ? महानगरपालिकेच्या प्रत्येक कारवाईला अर्ज आहे का. चुकीचे असेल तर कारवाई करा रस्ता आधी मोजा मग बांधकामाला परवानगी द्या. बांधकाम चालू असतांना आपल्या कर्मचा-याने मध्ये मध्ये व्हीजीट दिली पाहीजे. कोणत्या बिल्डरला माझा त्रास नाही. आम्ही जर बोललो तर वेगळा अर्थ निघतो.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** आपल्या विभागातर्फे जी परमीशन देताना रस्ता कन्फर्म केला जातो. स्थळ पाहणी केल्यानंतर कमेन्समेंट सर्टिफिकेट दिले जाते. या दोन वर्षात रस्ता मोजला आहे. नविन ले-आउट अंतिम करण्याच्या वेळेस सेंटर मार्कींग करुन पोल फिक्स केले तर वाद होणार नाही. भविष्यात मी काळजी घेईल स्पेशल टीम करुन याची पाहणी केली जाईल. जी परवानगी दिली आहे त्यानुसार बांधकाम झाले आहे की नाही. तपासणी करुन घेईल

**मा.श्री.कुमार वाकळे :-** तुमच्या पर्यंत अर्ज यायला किती वेळ लागतो.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** या संदर्भात मी काळजी घेईल.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** रोडमाप घेतांना त्याठिकाणी काहीतरी ठोकण्यात येईल. स.नं.७३.७४.७५ मध्ये जर पाहीले तर परिस्थिती खराब आहे. त्या लोकांवर कारवाई करा मागे घ्यायला सांगा.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** हा अत्यंत चांगला विषय घेतला रोड छोटे होत चालले आहेत यावर ॲक्शन काहीतरी घ्यावी लागेल. शहर बकाल होईल.

**मा.महापौर साहेब :-** नक्कीच आपण तोडगा काढू.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** आपला रस्ता अगोदर काढायचा मग त्यांना परवानगी द्यायची. नंब-या ठोकला तर संबंधिताच्या लक्षात येईल अगोदर रस्ता मोजुन घ्या. आपली हद्द कायम करा. मग परवानगी द्या बांधलेले पाडण्यात आनंद नाही.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** विभागा मार्फत रोड मार्कींग व अतिक्रमण हा विषय घेतलेला आहे.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** नंबरे ठोका त्याला एक विशीष्ट कलर द्या. ले-आउट अंतिम करतांना नंब-या ठोका.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** सर्व्हे नंबर व ले आउट कर्मचारी मागतात ते कर्मचा-यांना माहिती पाहीजे.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** रॅम्प रस्त्यावर काढतात. याबाबत संबंधित मालकांना कडक सूचना दिल्या पाहीजेत. रॅम्प रोडवर आणतात समोरा समोर रॅम्प आले तर महानगरपालिकेस रस्ता करता येत नाही. रोडवर येता कामा नाही. रॅम्प हा कंम्पौंडमध्ये आला पाहीजे. याबाबत धोरण निश्चित करा.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** काही ठिकाणी कंम्पौंडच्या बाहेर झाडे लावतात व त्याच्यापुढे तोडी ठेवतात आपल्या केअर टेकरला उचलायला सांगा.

**मा.श्री.दत्तात्रय कावरे :-** सरोष टाकी भरली नाही तर आम्हाला पाणी कसे येणार. पाणी सुटत नाही. प्रेशर नसतो. ३५-४० लोकांना पाणी मिळत नाही.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :-** शहरात गेल्या १ ते दीड महिन्यापासून पाणी विस्कळीत आहे. उपाय योजना करीत आहोत. शहरात पाणी वसंतटेकडी पाण्याच्या टाकीला पहाटे ४-५ फुट लेव्हल येईल तर शहरात पाणी देवू शकतो.

अमृत पाणी पुरवठा योजने अंतर्गत टाकीचा उपयोग करायचा उंचीचा फायदा घेवून लेव्हल मिळवण्याचा प्रयत्न केला परंतु येणारे पाणी दोन्हीकडे विभागले गेले. हवेचा दाब निर्माण व्हायचा परत सिस्टीम चेंज केली. जुनी टाकी वापरत आहोत. गेल्या उन्हाळयापासुन सातत्याने इलेक्ट्रीक कनेक्शन बंद होते. दोन तीन तासांचा फरक पडतो. टाक्या भरुन घेतांना अडचण आली. एका व्हॉलमनने घोळ घातला. टाक्या भरत नाहीत याचा शोध घेतला. वसंत टेकडी येथील तीन पाईप लाईनचा बॉयलर भरल्याने पाणी पुढे जात नव्हते. त्या साफ केल्या आता पाणीपुरवठा सुरु आहे.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे :-** आमच्या प्रभागातल्या पाण्याचा मोटार वारंवार बंद का करतात.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :-** येणारे पाणी हे एवढेच वापरु शकतो. त्यात वाढ होत नाही. वसंतटेकडी येथे मोटार चालू आहे.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे :-** आम्ही सारखा याचा पाठपुरावा करतो. मोटारी तर त्याच आहेत. अगोदर लेव्हल मिळत होती मग आता का मिळत नाही. तुम्ही सिरीयस घ्या वॉलमनने पाणी सुरु केले का त्याला मोटार बंद करायला सांगीतले जाते. आम्हाला फोन वगैरे करायचे नाही असे सांगीतले जाते. यात जर सुधारणा होत नसेल तर आम्हाला आमच्या पध्दतीने काम करावे लागेल. एक दिड महिन्यापुर्वी व्यवस्थीत पाणी पुरवठा होत होता. आता का होत नाही. कधीही प्रेशर मध्ये पाणी येत नाही. एका मोटारवर अठरा तासाच पाणी आहे.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :-** आपण कधीही चेक करु शकता. तुमच्या कडच्या मोटार काढुन टाकणार आहोत. नागरिकांना कनेक्शन घ्यायला आवाहन करु. नागरिकांनी कनेक्शन घेतल्यास टाकी चालू करता येईल. एकेक लाईन चालू करु.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे :-** महापौर, उपमहापौर यांनी याबाबत ठोस आदेश द्यावेत. पाणीपुरवठा जाणुनबुजून विस्कळीत झाला आहे. असा आमचा आरोप आहे.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** आमचा कल्याण रोडवर पाणीपुरवठा १५ दिवसावर गेला आहे. परत १४-१५ दिवसावर कल्याण रोडचा पाणीपुरवठा गेला आहे. कल्याण रोडवर अन्याय का यापुर्वी आठ दिवसावर पाणी पुरवठा आणला होता. मग आता परत बदल झाला. कल्याण रोड पाण्याचे टाकीचे १५ ऑगष्टला उद्घाटन करणार असे मिटींगमध्ये जाहीर केले. पण अजुन काही झाले नाही.

**मा.श्री.गणेश कवडे :-** वरील सर्वांना बिस्लरी व आम्हाला ग्लासामध्ये पाणी हे कसेकाय.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** ३५ टक्के पाणी कुठे जाते.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :-** नागापूर-बोल्हेगांवला पाणी पुरवठा होतो. नविन लाईनचे सावेडी गावठाणसाठी पाणी घेतले जाते. लपवा लपवीचे काहीच कारण नाही. सर्व गोष्टी ओपन आहे. खाली जी सिस्टीम लागते ती आपल्याकडे नाही. आपल्याकडे पाईपलाईन टाकल्या हायड्रोक्लोरीक टेस्टींग न घेता टाकल्या.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे :-** पाईपलाईन रोडवर अनधिकृत टॅप दिले आम्ही सांगीतले तुम्ही काय केले. आपण आमदारांसोबत मिटींग घेतली आहे. त्यावेळी मेनलाईन वरील टॅप काढायचे असे ठरले होते. मग काय केले. मी प्रत्येक मिटींगमध्ये सांगीतले ३ वर्ष झाले. औरंगाबाद रोडवरच्या मेन लाईनवरील टॅप काढा पण अजुन काढले नाही. या सगळया गोष्टीला जबाबदार कोण आम्ही दाखवले. पुढे कधीच होत नाही.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :-** औरंगाबाद हायवेवर काही कनेक्शन आहेत. झोन ऑफीसर व सातपुते इंजिनियर यांना सूचना दिलेल्या आहेत. पोलीस बंदोबस्त घेवून कारवाई होईल.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे :-** मिटींग होवून दीड महिना झाला. मग कारवाई का केली नाही. महापौर उपमहापौर यांनी याची गंभीर नोंद घ्या. या लोकांनी व त्यांच्या व त्यांच्या खालच्या लोकांनी त्यांच्या पदावर राहायचे की नाही हे ठरवा. आमदार साहेबांचा अवमान झालेला आहे.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** बेकायदेशीर कनेक्शन काढण्याचे त्वरीत आदेश निकम यांनी द्यावेत.

**मा.श्री.अविनाश घुले :-** उड्डाणपुलावरील रस्त्यावर १०० ते १५० कनेक्शन मेन लाईनवर आढळले. त्या लाईनवर परत कनेक्शन होवू देवू नका.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :-** खाजगी यंत्रणा आलेली आहे. प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविला आहे. बिगारी, वॉचमन, टेक्नो फिटर कर्मचारी उपलब्ध होतील.

**मा.श्री.दत्तात्रय कावरे :-** आम्ही कोणास पाणी देण्याच्या विरोधात नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** ले-आउट संदर्भात वाकळेंनी जी तक्रार केली त्या संदर्भात बोलतो एक माहिती ०८/०५/२०२१ ला मी माहिती अधिकारात पत्र दिल पण अद्याप मला उत्तर दिले नाही. मला अपीलात जायची वेळ आली. बांधकाम विभागाने उत्तर दिले त्यानंतर नगररचना विभागाला दि.०८/०५/२०२१ ला पत्र दिले. बिल्डर लोकांची मनमानी आहे. खोकर नाल्यावर पुल बांधला. ना नगररचना विभागाची परवानगी नाही. त्यावर ले-आउट तुम्ही मंजूर करता मला याचे उत्तर द्या.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** एक ले-आउट मिळत नव्हता जुना आहे. माहिती मिळून जाईल.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** मला अपिलात जायची वेळ आली. तो पुल बांधला कसा.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** पुलाच्या मंजूरीसाठी मुंबईला जावे लागते.

**इंजिनियर श्री.बल्लाळ :-** यादी आहे. त्यांचे उत्तर तयार केले. माहिती अधिकारात अर्ज नाही. मोरचूद नगर सर्व्हे ६ ची मागणी आहे. एक ले-आउट सापडत नव्हता चूकीची माहिती जावू नये म्हणुन थांबलो. दोन दिवसात माहिती देतो. नाल्याच्या पुलाला परवानगी दिली नाही. तात्पुरत्या मंजूरीत परवानगी देता येईल. त्या रस्त्यावरुन ॲक्सेस देता येईल. मंजूरीतच कंडीशन टाकली आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** पुलाला बांधकाम परवानगी घ्यायला पाहीजे होती. एस्टीमेट व्हायला पाहीजे होते पण तसे झाले नाही. आम्ही तुम्हाला सर्व नगरसेवक मिळून प्रस्ताव देणार आहे. बिल्डर जो विकास करतो तो आपल्याकडे घ्या. आपला अधिकार आहे. चांगल्या दर्जाचे काम होईल. थातुर मातुर काम करतो. मी एक पत्र देतो सर्व नगरसेवकांची त्यावर सही करुन घ्या. चांगल्या दर्जाचे कामे होतील.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** काही ठिकाणी बिल्डरने चेंबर बांधले अशा ठिकाणी पाईपच नाहीत, अशी वस्तुस्थिती आहे. यावर १०० टक्के निर्णय घ्यावा लागेल.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** तो जो पुल बांधला तो पुरनियंत्रण रेषेवर बांधला.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** पुलाचे बांधकामासाठी परवानगी झाली. मुंबईला एक संस्था आहे. त्यांची परवानगी लागते.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** ठिकठिकाणी चेंबर करता जोडत नाही. आयुक्तांना मी पत्र दिले होते. त्या नगरसेवकांच्या पत्रांना उत्तरे दिली जात नाहीत. कधीही उत्तर येत नाही. शिंदे साहेबांनी माहिती अधिकारात माहिती मागवावी लागली. आयुक्त साहेबांना पत्राला उत्तर देणेबाबत विनंती केली बिल्डरांनी बेसीक सुविधा देणे आवश्यक आहे. बिल्डींग परवानगी कंम्पीशन देण्या अगोदर एक रोड कंम्पलसरी करावा. नगरसेवकांना

नागरिक परेशान करतात. नियमावली क डक करावी. परमिशन देण्याअगोदर काही ठिकाणी कमी रोड भरतात. नगररचना विभागाला विचारले तर रिव्हाईज ले आउट आहे अशी वेगळी उत्तरे देतात. नगरसेवकांना काम करतांना अवघड होईल. पाण्याच्या लाईन आम्ही बुजून द्यायच्या. स्थानिक नगरसेवकांची सही घेतली तर हे प्रश्न भेडसावणार नाही. बाकीच्या नगरसेवकांच्या पत्रांना उत्तरे देण्यांत यावी.

**मा.आयुक्त साहेब :-** ८ दिवसात सदस्यांना उत्तरे द्या १ महिन्यातच उत्तरे देण्यांत यावी. काही रस्त्यांची तपासणी करु चुकीचे असेल तर कारवाई करु जॉईंटली व्हीजीट करायला हरकत नाही मी नगररचनाकार यांना सांगतो.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** २ नंबरच्या विषयावर मला बोलायचे आहे. त्यांचे अहमदनगर शहरावर खूप प्रेम होते. त्यांचे मोलाचे सहकार्य अहमदनगर शहरास होते २ रा हा विषय नामकरण करण्यांत यावे दोन्ही विषय मंजूर करावेत.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** अजेंडयावरील विषय घ्या.

विषय क्रमांक १८ चे वाचन

**मा.महापौर साहेब :-** विषय मंजूर.

विषय क्रमांक १९ चे वाचन

**मा.सौ.सुरेखा कदम :-** कोहीनूर क्लॉथ स्टोअरचे गांधी यांचे नगर शहरावर खूप प्रेम होते. कोहीनूरच्या माध्यमातुन नगर शहराचे नाव राज्यात नेले आहे. अशा व्यक्तीचे नाव नगर शहरास देण्यांत यावे.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** प्रदीप गांधी यशस्वी उद्योजक होते त्यांनी नगर शहराचे नावलौकीक राज्यभरात केले. त्यांचेकडे ४०० कर्मचारी काम करतात त्यांना उपजिवीकेचे साधन उपलब्ध करुन दिले. व्यवसाय करत असतांना सामाजिक, सांस्कृतिक योगदान त्यांनी दिले आहे. नगरशहर सुशोभिकरणाच्या कामात योगदान दिले. कोव्हीड काळात बूथ हॉस्पीटलला चांगली मदत केली आहे. रसिक ग्रुपच्या माध्यमातून जो कार्यक्रम होता त्याला मदत दिली जायची सर्व गोष्टीत त्यांनी सहकार्य केले आहे. सन्माननीय प्रदीपशेठ गांधी यांचे नाव देण्याचा सर्व खर्चास मंजूरी द्यावी. नामकरणाचा जो कार्यक्रम होईल त्याचा खर्च महानगरपालिकेने करावा. प्रदीपशेठ गांधी यांचा १८ तारखेला स्मृतीदिन आहे. त्या दिवशी हा कार्यक्रम घ्यावा.

**मा.सौ.मीना चोपडा :-** पुढील पिढीला आठवण व्हावी. पुण्यतिथीच्या दिवशी फलकावर नांव द्यावे.

विषय क्रमांक २२ कोरोनामुळे खूप मोठे नुकसान झालेले आहे. हा बोजा सहन होत नाही. नियम १९४९ कायद्यानुसार कलम १३३ नुसार घरपट्टी पाणीपट्टी माफ करावी.

**मा.महापौर साहेब :-** विषय क्रमांक १८ व १९ चे ऑफिस रिपोर्ट मंजूर. पुढचा विषय घ्यावा.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** आपल्या सभागृहात चार वर्षापुर्वी छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविणेचा विषय मांडला तो सभागृहाने मंजूर केला त्यावर आत्तापर्यंत काय कार्यवाही झाली. वेगवेगळया संघटना आता मागणी करायला लागल्या आहेत.

संभाजी महाराजांचा पुतळा मोबाईल टॉवरच्या हेडमधुन उभा करायचा आहे.

**अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :-** महानगरपालिका आवारात शिवाजी महाराज पुतळा उभारणेस महासभेने ठराव केला. मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. त्यानुसार पोलीस विभागाकडे दीड वर्षापुर्वी प्रस्ताव सादर केला पण मा.जिल्हाधिकारी यांचेकडून येवू द्या असे सांगीतले. मा.जिल्हाधिकारी महोदयांनी १३ प्रपत्रानुसार सादर करण्यांस सांगीतले आहे. क्ले मॉडेल, चीफ आर्टिकल, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाची संमती पाहिजे ती शासनाकडे पाठवत आहोत.

छत्रपती संभाजी महाराज पुतळयास सभेने मंजूरी दिली. पुतळयाचे ८० टक्के पेमेंट अदा केले. पोलीस विभागाने सहमती दिली नव्हती. गंगा उद्यान येथे बसवणे योग्य होईल असे सांगीतले. प्रोफेसर कॉलनी शॉपिंग सेंटरच्या जागेत पुतळा बसवण्यास परवानगी मागीतली कोव्हीडमुळे उशीर झालेला आहे. शासनाकडे एनओसी बाबत आठ दिवसात प्रस्ताव जाईल जिल्हाधिकारी साहेब व एस.पी.साहेबांकडे पाठपुरावा करु लवकरात लवकर करु.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** असे रुलिंग द्यावे. पुतळयाचे एक तैलचित्र फिक्स करुन पुतळा बनविण्याचे ऑर्डर देवून टाका शासनाकडून परवानगी घेत राहू.

**मा.आयुक्त साहेब :-** पुतळयाच्या बाबतीत शासनाने २०१७ ला निर्णय घेतला जिल्हा स्तरावर समिती स्थापन केली. चार पुतळे उभारणे प्रश्न प्रलंबीत आहे. यामध्ये २०१७ जी.आर.मध्ये १२-१३ गोष्टी सांगीतल्या आहेत. पुतळा कसा पाहीजे. अगोदर क्ले मॉडेल बनवावे लागते. ते झाल्यानंतर महानगरपालिकेने मॉडेल ॲप्रुव्ह केले नंतर पुढच्या गोष्टी आपल्यास करायच्या आहेत. यासाठी मी कालच २ टक्के शहर अभियंता, उपायुक्त डांगे यांचेशी याविषयावर चर्चा केली आहे. तीन महिन्यामध्ये एक ॲक्शन प्लॅन करु. क्ले मॉडेल बनवून आपल्या लेव्हलला समिती करुन मॉडेल बनवावे लागेल ते फायनल झाल्यानंतर कलासंचालनालयची मंजूरी घ्यावी लागेल. चार ते सहा महिन्यात पूर्ण होईल. डांगेसाहेबांकडे हे काम पूर्ण दिले आहे. डिसेंबर पुर्वी दोन पुतळयाला अडचण येणार नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले पुर्णाकृती पुतळे संदर्भात महात्मा फुले पुतळयाची जागा निश्चित करतांना हाईट परवानगी देतांना मुळ व्यक्तीमत्वात बदल करता येत नाही. ते पाहता उंचीची जागा उपलब्ध होईल की नाही ते पहावे लागेल. पुतळा कसा पाहिजे हे अगोदर ठरवावे लागेल.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** खुर्चीवर बसलेले महात्माफुले ही पुतळे आहेत.

**मा.आयुक्त साहेब :-** महासभेने चार-पाच सदस्यांची समिती ठरवा. डिसेंबरच्या आत पुतळे बसतील.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** प्रत्येक सभागृह नेत्यांकडून नाव सूचवावे. राष्ट्रवादीचे श्री.कुमार वाकळे, शिवसेनेतील श्री.अनिल शिंदे, भारतीय जनता पार्टीकडून श्री.रविंद्र बारस्कर, कॉग्रेस श्रीमती.रुपालीताई वारे, श्री.आसीफ सुलतान.

**उपमहापौर मा.श्री.गणेश भोसले :-** श्रीमती. अश्विनी सचिन जाधव यांना घेण्यांत यावे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** कारागीर नगर शहरात आहेत. नॅशनल ॲवार्ड मिळालेले आहेत. आपल्याला कायम मार्गदर्शन होईल. कांबळे इंटरनॅशनल कारागीर आहेत.

**मा.आयुक्त साहेब :-** उद्या आदेश काढतो. समितीला पहिल्यांदा तिथे जावे लागेल. चारही पुतळयाच्या ठिकाणी जागा फायनल करतो. क्ले मॉडेल करावे यासाठी तुमची मिटींग लावून घ्या.

**मा.महापौर साहेब :-** श्री.कुमार वाकळे , श्री.रविंद्र बारस्कर, श्रीमती.रुपालीताई वारे, श्रीमती.अश्विनी सचिन जाधव, श्री.आसीफ सुलतान, महापौर आणि उपमहापौर

विषय क्रमांक २०

**मा.सौ,शीला चव्हाण :-** सिध्दार्थनगर भागाचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. मध्यंतरी ५ ते ५.३० वाजता सोडायचे आता ८.०० किंवा ८.३० वाजता पाणी येते. कामावर केंव्हा जायचे.पहिले २.०० ते २.३० वाजता पाणी यायचे तेंव्हा तक्रार नव्हती आता मी या लोकांना काय उत्तर देवू. २.३० वाजता पाणी सोडण्यांत यावे. येथे बहुतांश सफाई कामगार राहतात त्यांना सकाळी कामावर जावे लागते. उशीरा पाणी सोडल्याने त्यांना पाणी भरता येत नाही.

**इंजिनियर श्री.सातपुते :-** पाणी पुरवठा सुरळीत झाला की, वेळेचे पुर्वीसारखे नियोजन करीत आहोत. आयुक्त साहेबांशी कालच चर्चा झाली आहे. १५-२० दिवसांपासुन एमएसईबी मुळे पाणी पुरवठा विस्कळीत झालेला आहे. १५-२० दिवसानंतर सुरळीत झाले की निर्णय घेवू.

**उपमहापौर मा.श्री.गणेश भोसले :-** पाणी चहा देतांना खाली व स्टेजवर एकच प्रकारचे कप द्यावे.

**मा.श्री.रामदास आंधळे :-** नवलेनगर मध्ये रस्त्यावर खड्डे पडले आहेत. कुणीतरी नळ कनेक्शन घेतात. नवलेनगर, आनंदनगर मध्ये घंटा गाडी येत नाही. तात्पुरता मुरम टाका. पावसाळयानंतर व्यवस्थीत करा.

**शहर अभियंता श्री.इथापे :-** पाउस चालू असल्यामुळे डांबरीकरणाचे पॅचींग करता येत नसल्याने शहरात ब-याच ठिकाणी खड्डे आहेत. डब्ल्यु.बी.एम.पॅचींग केले, प्रभाग क्रमांक १ व ३ साठी टेंडर मागविले. पुढील आठवडयात पाउस आला नाहीतर पॅचींग करणार आहोत. प्रामुख्याने शहरातील मोठे रस्ते डी.पी.रोड त्यानंतर सेकंड फेजमध्ये इतर रस्ते घेणार आहोत.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** तपोवन रोडला जी आग लागली त्या गाळेधारकांना शासनाकडून काहीतरी मदत करण्यासाठी काही करता आले तर मदत करावी. त्यावर निर्णय घ्या. सर्वजण पाहणीला गेले होते.

**मा.आयुक्त साहेब :-** महसुल विभागाचे तलाठी यांनी पंचनामा केला आहे. आगीचे कारण वगैरे पाहून ते निर्णय घेतील. महानगरपालिकेकडे अशी तरतुद नाही. प्रस्ताव शासनाकडे पाठवू शकतो. शासनाकडे मागणी करु.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** बांधकाम परवानगी देतांना त्यानंतर त्या त्या भागात आपला एक टेक्नीशीयन माणूस पाहणीसाठी असतो त्यास जर अतिरिक्त काम दिले कंम्पौंडच्या बाहेर नागरिक झाडे दोन्ही बाजुने लावतात. एक सर्व्हे त्यांनी करावा ते काढुन घ्यावे अशी सूचना करावी.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** परवानगी देतांना कमीत कमी पाच झाडे लावणे बंधनकारक केले आहे. रेनवॉटर हार्व्हेस्टींग बंधनकारक केले आहे. रोडची मार्कींग करायची मंजूरी दिली आहे. त्यानुसार जबाबदारी नागरिकांची आहे. प्रशासनाने आदेश दिले त्यानुसार पाहणी केली जाईल.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** चव्हाण यांची १० वर्षाची मुलगी डेंग्युने वारली. मी वारंवार संपर्क केला आरोग्यअधिकारी या सभेत हजर पाहीजे. या मुलीचे रेकॉर्ड आपल्याकडे आले ती धर्मा हॉस्पीटलला वारली.

**आरोग्य अधिकारी डॉ.श्री.राजुरकर :-** माहिती घेवून सांगतो.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** कोरोनाचे बील भरुन नागरिकांचे कंबरडे मोडले आहे. डेंग्युने लोक मरतात.

**आरोग्य अधिकारी डॉ.श्री.राजुरकर :-** ॲन्टीजेन पॉझिटीव्ह संशयीत रुग्ण धरले जातात. रक्ताचे नमुने पॉझिटीव्ह आल्यानंतर सर्व्हेक्षण करुन ॲबेटिंग करुन घेतले आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** माझ्या वॉर्डात सध्या २५ पेशंट आहेत. आपण काही केलेले नाही. याची माहिती घेतली का.

**आरोग्य अधिकारी डॉ.श्री.राजुरकर :-** साथ रोगाची माहिती खाजगी रुग्णालयाकडून माहिती मिळाली की, शासनाकडून माहिती घेवून कारवाई करतो. जलजन्य आजार डासामुळे होतो. आरोग्य केंद्रामार्फत सर्व्हेक्षण करतो. मलेरिया मार्फत स्प्रे करणेचे काम नेहमीसारखे पावसाळयात करतो. तुम्ही ज्या मुलीची माहिती दिली त्यांची माहिती घेतो.

**उपमहापौर मा.श्री.गणेश भोसले :-** फॉगींग फवारणी कुमार भाउंच्या वॉर्डात करा. तुम्ही समक्ष जा.

**मा.सौ.रुपाली वारे :-** २१ नंबर विषय आहे. एकुण किती जागा रिक्त आहेत.

**आरोग्य अधिकारी डॉ.श्री.राजुरकर :-** सध्या एनयुएचएम चे ६२ पदे आहेत. ५५ भरले ७ रिक्त आहेत. राष्ट्रीय क्षयरोग १७ पद भरले व एक रिक्त आहे. ८ रिक्त २ डॉक्टर, ४ सिस्टर बाकीचे टेक्नीशियन आहेत. पद भरण्याचा अधिकार डेप्युटी डायरेक्टर यांना आहेत. गेल्या ६ महिन्यापासून रिक्त आहेत. पाठपुरावा केला आहे. आपल्याला अधिकार मिळाल्यास करु. आपल्याला भरतीचे अधिकाराबाबत आता मागच्या महिन्यात कळाले आहे.

**मा.सौ.रुपाली वारे :-** प्रस्ताव आस्थापना विभागाकडून आपण भरती करु शकतो का ?

**आरोग्य अधिकारी डॉ.श्री.राजुरकर :-** पद निर्मितीसाठी प्रस्ताव महासभेसमोर सादर केला आहे. त्यापुढे शासनाची पुढची कार्यवाही आस्थापना विभागामार्फत होणार आहे.

**मा.सौ.रुपाली वारे :-** आपण विषय मंजूर केला तर प्रशासन मंजूरी देईल का.

**आरोग्य अधिकारी डॉ.श्री.राजुरकर :-** प्रस्ताव पदनिर्मितीचा आहे. प्रशासनाने बिंदु नामावली सामाजिक आरक्षण कीती वर्षाच्या व्यक्तीला प्राधान्य द्यायचे याबाबत प्रशासन घेईल. सध्या त्यांना एकत्रित वेतन दिले जाते. शासनाकडून वेतन मिळालेल्या जागांचा भार महानगरपालिकेवर नाही.

**मा.सौ.रुपाली वारे :-** योग्य मोबदला त्यांना मिळालाच पाहीजे. त्यांनी कोरोना बाबत चांगले कार्य केले आहे.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** हायवे लगत दुकानदारांना केडगांवच्या ११७ लोकांना नोटीसा दिल्या. उपायुक्त शहरात कोणतीही परवानगी न घेता टपरी बांधल्या त्यांना कलम ५२-५३ खाली नोटीस दिल्या. २२०० सुनावण्या घेतल्या. ग्रामपंचायत झाल्यापासुन ही दुकाने आहेत. त्यांना नोटीसा गेल्या आहेत. त्यांना सर्वांना न कळवता एक-एक दोन दोन लोक बोलावले गेले. त्या त्या भागातल्या प्रतिनिधींना कळवले का.

**उपायुक्त श्री.डांगे :-** अनधिकृत व अतिक्रमण संदर्भात माहिती देत नाही. अशी आपलीच मागणी असते. याठिकाणी अनधिकृत बांधकाम झाले त्यांचे म्हणणे ऐकुण घेण्यासाठी सुनावणी लावली.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** आम्ही त्यांच्या मध्ये येत नाही. त्या नागरिकांच्या समस्या ऐकुण घेण्यासाठी एक मिटींग घ्या.

**मा.श्री.विनीत पाऊलबुधे :-** पत्र्याच्या टप-यांना टॅक्स आकारणी करण्यांत आली का.

**इजिनियर श्री.बल्लाळ :-** एमआरपी ॲक्ट खाली कलम ५२-५५ खाली नोटीस दिली. बिल्डींग परवानगी घेतली असेल तर ती दाखल करा. अथवा ३० दिवसात परवानगी घ्या. असेल तर इकडे सादर करा. ३ मुद्यांचे ऑप्शन दिले आहे. प्रत्येकाने उत्तर दिलेले नाही. एकानेही परवानगी आणली नाही. ग्रामपंचायतीची परवानगी असू द्या प्लॉटच्या बाहेर बांधतात. रस्त्याला अडचण आणतात. टॅक्स पावती मध्ये टॅक्स लागला म्हणजे बांधकाम अधिकृत होत नाही.

**मा.श्री.विनीत पाऊलबुधे :-** अनधिकृत असेल तर कारवाई करावी. पट्टी आकारु नये.

**इंजिनियर श्री.बल्लाळ :-** परवानगी असेल तर द्यावी नक्कीच विचार होईल.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** २०-२० ४०-४० ६०-६० च्या ग्रुपने बोलवा.

**उपमहापौर मा.श्री.गणेश भोसले :-** बोलावुन घ्या. केडगांव ग्रामपंचायत असतांना परवानगी घेतली. ती सापडत नाही. रेकॉर्ड हॅण्ड ओव्हर केले. ५० वर्षाचे रेकॉर्ड कोणाकडे कागद नाही. त्या काळात या गोष्टीना महत्व नव्हते. त्यावेळेचे घर आहेत. दुकाने आहेत गावठाण भागातही हा विषय आहे. तुम्ही रेकॉर्ड सापडा. त्यावेळेला ग्रामपंचायत होती. केडगांवचे रेकॉर्ड शोधा. रेकॉर्ड तुम्ही शोधा.

**इंजिनियर श्री.बल्लाळ :-** समाज अंतरात जे बांधकाम आहे त्यांना नोटीसा काढल्या आहेत.

**उपमहापौर मा.श्री.गणेश भोसले :-** साईड मार्जिन मध्ये जे बांधले ते काढा.

**मा.महापौर साहेब :-** पुढचा विषय २१ चे वाचन करा. १८-१९-२० ऑफिस रिपोर्ट मंजूर केले आहेत.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** विषय क्रमांक २०

**इंजिनियर श्री.मेहेत्रे :-** अेएचपी अंतर्गत ४ योजना मंजूर असुन कुठलाही निधी आलेला नाही. संजय नगरचे जे बिल्डींगचे काम चालू केले आहे. लाभार्थी यांचे बँक लोन होत नाही. मार्केटींग व्यवस्थीत होत नाही. कर्ज सहाय्यासाठी लाभार्थी १ % देईल. १७३२ घरे आहेत. स्टेटचा संजयनगरला १३ लाखाचा फंड वर्ग करणार आहोत.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** आयुक्त साहेब यांनी निधीसाठी फॉलोअप घ्यावा.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** २१ नंबर विषयावर बोलतो. कोरोनाच्या काळात कोणीच कोणाला मदत करत नव्हते. अशी परिस्थित असतांना आरोग्य सेवकाने स्वॅब घ्यायचे काम केले. लस सकाळी ९.०० ते ६.०० पर्यंत देण्याचे काम केले. आरोग्य सेवकांना कायम करण्याचा विषय याठिकाणी आला या सेविकांना नक्की परमनंट करु शकतो का. हा अधिकार महासभेला आहे का.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** वशीला वगैरे न करता अत्यंत कठीण काळात त्यांनी काम केले. त्यामुळे सर्वांना सेवेमध्ये सामावुन घ्यावे वशीला वगैरे करु नये अशी मी विनंती करतो. कोणावर अन्याय होणार नाही. या पध्दतीने काम करावे.

**मा.सौ.सुपिया जाधव :-** २१ नंबर बाबत बिंदुनामावली शासनाकडे पाठवावे सर्व कायदेशीर बाबी तपासून शासनाकडे पाठवावे जेणेकरुन प्रशासन अडचणीत येणार नाही.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** प्रस्ताव फक्त अवलोकनार्थ पाठवला आहे. मा.वाकळे साहेबांनी जे बोलले त्या पध्दतीने सर्व कर्मचा-यांनी जीवावर उदार होवून काम केलेले आहे. अधिका-यांनी नावे सुचवायचे व त्यांचे नाव घ्यायचे असे होता कामा नये. चांगल्या काम करणा-या कर्मचा-याला बाहेर टाकतात जो विषय आहे त्यास सर्वांची मंजूरी आहे. महाराष्ट्र शासन पगार देत असेल आपण देत नसू तर सर्वांना घ्या.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** १७ पदे भरायची आहेत. आर.सी.एच.ची ६२ पदे भरायची आहेत. हा प्रस्ताव आस्थापना कडून आला असायला पाहीजे होते. आपण आज ठराव मंजूर करणार प्रशासन आस्थापना त्याची अंमलबजावणी करील का. आयुक्तांनी सांगावे आम्ही यात न्याय देणार. नगरविकास खात्याचे निर्देश आहेत. ३ जून २०२१ रोजीचे पत्र आहे. ते पत्र वाचून दाखविले. राजुरकर डॉक्टरांनी १७ व ६२ पदच घेतली कोव्हीड काळात इतर कर्मचारी काम करत होते त्यांना सामावून घेतले का. फक्त डॉक्टर परिचारीका घेतले त्यांनाही रिलीफ मिळाला पाहीजे.

**आरोग्य अधिकारी डॉ.श्री.राजुरकर :-** एनयुएचएम एकुण ७९ पद कार्यरत आहेत. त्या कर्मचा-यांचे ठेवले आहे. शासनाचे जे पत्र आपण दाखवले ते आले आहे.कोव्हीड हॉस्पीटल नाही. कोव्हीड केअर सेंटर आहे. डायरेक्ट संपर्कात कर्मचारी येत नाही १ वर्ष सुध्दा कालावधी पूर्ण झालेला नाही त्यांना घेता येत नाही. स्थानीक पातळवर ठरवायचे आहे. इतर महानगरपालिकेने असा कुठलाही निर्णय घेतलेला नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** डॉक्टर परिचारीका कोव्हीड काळात ज्यांनी सहभाग घेतला त्या सर्वांना समाविष्ठ करुन घ्यावे.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** कर्मचा-यांना स्पष्टीकरण दिले तर त्यांच्या लक्षात येईल. फक्त महानगरपालिकेची मंजूरी घेवून नाहीतर शासनाची मंजूरी लागेल. आयुक्तांनी थोडा पाठपुरावा केला तर नक्कीच ते कायम होती. कोरोना काळात दिवसभर काम करुन घरी गेल्यानंतर मुलाला जवळ घेत नव्हत्या. त्या लोकांना स्पष्टीकरण दिले तर बरे होईल. सर्वांनी पाठपुरावा करावा.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** कोव्हीड काळात जीव धोक्यात घालून काम केले आहे. ६२ व ७९ मधून राहीलेल्यांचा जरुन विचार झाला पाहीजे एक दिवस जरी काम केले तरी कोव्हीड संपर्कात येवून त्यांनी जीव धोक्यात घातला आहे. त्यांचे लक्ष लागलेले आहे. राहीलेल्यांचा समावेश करुन घ्यावा.

**मा.सौ.लता शेळके :-** आरोग्य विभागाचे कर्मचारी १०-१५ वर्षापासून काम करतात त्यांना मंजूरी द्यावी. दोन वर्षापासून कोरोना काळात त्यांनी जीव धोक्यात घालून काम केले त्यामुळे त्यांना कायम करावे हि विनंती. शासनाकडे प्रस्ताव मांडावा.

**आरोग्य अधिकारी डॉ.श्री.राजुरकर :-** ७९ पदे मंजूर आहेत. १० वर्ष सेवा - १३, ७ वर्षापेक्षा जास्त - ३१, ३ वर्षापेक्षा जास्त - १२, ३ खाली १५ आहेत. सन २००६ मध्ये अर्बन आरसीएच कार्यक्रम मंजूर झाला त्या अनुदानातुन ३ आरोग्य केंद्र बांधले सर्व आरोग्य केंद्रात माता बाल संगोपन स्कीम अंतर्गत कंत्राटी सेवा देतात. त्याठिकाणी महानगरपालिकेचा स्टाफ तुरळक आहे. इतर महानगरपालिकांत आरसीएच स्कीत अंतर्गत जे कर्मचारी कार्यरत आहेत त्याबाबत माहिती घेतली. भिंवडी महानगरपालिकेत सन २००७ साली - ४० पदांना मंजूरी, मालेगांव महानगरपालिका - ३० पदांना मंजूरी दिली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका - ५० पदांबाबत निर्णय प्रलंबित, मालेगांव महानगरपालिकेत ३० पदे शासनाने मान्य केली. त्यावेळी ३५ टक्के खर्चाची मर्यादा शिथील केली आहे. आत्ताचा प्रस्ताव नविन पद निर्मिती बाबत आहे. आरसीएच अंतर्गत २२ कर्मचारी जुने आहेत. त्या पदावर सामावुन घेणे असा विषय आहे. आरसीएच कर्मचा-यांपैकी १७ कर्मचारी यांनी कोर्टात केस दाखल केली आहे. ४ गेलेले नाहीत. हे जास्त वर्ष सर्व्हीस करतात. २१ कर्मचारी जुने आहेत. २१ कर्मचा-यांना आस्थापना सुचीवर घेण्यासाठी सन २०१७ साली प्रस्ताव दिला होता. परंतु आस्थापना खर्च जास्त असल्याने पद मंजूरीस शासनाने नकार दिला त्यामुळे आता दुस-यांदा प्रयत्न करीत आहोत.

**मा.श्री.अविनाश घुले :-** इंजिनियर्स टेक्नीशीयन पदे थोडी आहेत. याबाबतीत काही लक्ष देणार आहोत की नाही. स्पेशल केस म्हणुन मंजूर करुन आणायला पाहीजे. महापौर उपमहापौर आयुक्त असतील आपण दखल घेणार आहोत की नाही. काही रिटायर होणार काहींना व्हीआरएस घ्यायची आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** महानगरपालिकेचा स्टॅपिंग पॅटर्न २०१६ ला मंजूर झाला. २९०० पदे मंजूर आहेत. त्यापैकी १७०० कार्यरत आहेत. त्यातील काही पदे तांत्रिक आहेत. महानगरपालिकेने यापूर्वी ब-याचवेळा प्रस्ताव पाठवले पण आस्थापना खर्चामुळे नविन पदे भरता येत नाही. वरची पदे जी आहेत ती डेप्युटेशनवर मागणी करा असे सांगीतले आहे. त्यानुसार कारवाई केली आहे. प्रतिनियुक्तीची पदे मागत आहोत. काही खर्च कमी करुन आराखडा सादर केला आहे. पुढच्या आठवडयात मी मुंबईला जाणार आहे.

आरसीएच पद भरता येतील का ? दोन योजनांमध्ये पद महानगरपालिकेत कार्यरत आहेत. ६२ पदे रिक्त आहेत. ही पदे महानगरपालिकेमार्फत भरण्याची शासनाने नव्याने तरतुद केली आहे. यापुर्वी पद भरती साठी दोन तीन वेळा जाहीरात काढली. काही पद कंत्राटी पध्दतीने घेतली आहेत. १४७ ते १५० पदे आहेत. एनयुएचएम मध्ये पैसे वापरायला परवानगी दिली होती. कोरोनाची तिसरी लाट येईल म्हणुन आपण काही पदे ठेवलेली आहेत. महानगरपालिकेकडे ही पदे एनयुएचएम अंतर्गत कार्यरत आहेत. १ महिन्यात ठराव करुन पाठवावा लागेल. या पदांना नगरविकास विभागाकडून महानगरपालिकेच्या आस्थापनावर मंजूरी घ्यावी लागेल. त्या पदाचे समावेशन करावे लागेल तो खर्च एनयुएचएम मधुन मिळावा. समावेशन करण्यासाठी एनयुएचएमकडे पाठवायचा व पदनिर्मितीचा नगरविकास विभागाकडे पाठवायचा आहे. रिक्त पद भरण्याची ७-८ दिवसात कारवाई करु. दोन्ही पद मंजूरीचा आपल्याला समावेश करावा लागेल.

**मा.श्री.अविनाश घुले :-** काही परिचारीकांनी माझ्याकडे पत्र दिले. ६ वर्षे झाली, १० वर्षे झाली काम करीत आहोत. मानधनावर आहोत. त्यांना एक रुपया वाढ नाही. काहीतरी टक्केवारीत वाढ करण्याचे धोरण याठिकाणी ठरवावे लागेल. स्थायी समितीकडे १०९ पदांचा प्रस्ताव आला. त्यात बिगारी यांना ५०० रुपये वेतन आहे. रजपुत सिस्टर, क्षेत्रे सिस्टर यांना २४ वर्षे झाली त्यांना १३ हजार रुपये पगार आहे असे का ? धोरण ठरवावे काहीतरी मानधन वाढवून द्यावे.

**मा.आयुक्त साहेब :-** माताबाल संगोपन मध्ये भरलेला स्टाफ दुसरा महानगरपालिका दवाखान्यात काम करतात. पहिली योजना सेवेतुन काढणे, सुप्रीम कोर्टात केस चालू आहे. त्यांची मागणी मानधन वाढुन द्यावे. दुसरी मागणी - त्यांना मानधन वाढवले नाही. मी १०० टक्के चांगली शिफारस करतो योग्य तो निर्णय घेवू. दोन सिस्टर कोर्टात आहेत. त्यांची माहिती घेवून बोलतो नंतर आता काही बोलत नाही.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** टोकीओ ऑलंपिक स्पर्धांमध्ये गोल्ड व सिल्व्हर मेडल मिळवलेल्या सर्व खेळाडुंनी भारताचे नांव उज्वल केले. त्या सर्व पदक विजेत्या खेळाडूंच्या अभिनंदनाचा ठराव याठिकाणी मांडते.

**मा.महापौर साहेब :-** आस्थापना विभागाने प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविण्यास ही सभा मान्यता देत आहे.

विषय क्रमांक २२ चे वाचन करण्यांत आले.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** सद्यस्थितीत ४१ हजार मालमत्ता करावर २० टक्के कर आकारणी करतो. या अगोदर ज्या संस्थेला काम दिले त्या संस्थेने अर्धवट काम सोडून दिले. मालमत्ता कराचे रीव्हीजन करायचे आहे. अंदाजे ८०,००० इमारती ३५००० प्लॉट रिव्हीजन झाले नाही. ४१००० मिळकतीचे वाढीव बांधकाम झाले आहे त्याचेही रिव्हीजन झाले नाही. पुर्वीच्या मालमत्ता धारकाने घर पाडून स्लॅबचे बांधले त्याचे रिव्हीजन झाले नाही. ७०० सफाई कर्मचारी सोडल्यानंतर १६०० कर्मचारी आपल्याकडे आहेत. प्रभाग निहाय प्रत्येक गोष्टीची माहिती आहे. जीपीएस प्रणाली व्दारे रिव्हीजन करायचे या मताशी सहमत आहे पण यावर खर्च होणार आहे. पगार होत नाही. लाईट बील देता येत नाही. वर्षाला जीएसटी ६ कोटी येतात दर महिन्याला १२ कोटी खर्च येतो. आम्हाला निधी मिळत नाही. निधी मिळाला तर ठेकेदार तयार होत नाही. वाढीव दर लावायला माझा विरोध आहे. रिव्हीजनला माझा विरोध नाही. किती नळ कनेक्शन बोगस आहेत. ८० हजार मिळकती आहेत फौजदारी गुन्हा दाखल करावा अनधिकृत नळ कनेक्शन असणा-यांवर. ३० हजार लोकां कडून पाणी पट्टी घेतो. उर्वरीत ५० हजारावर कारवाई करीत नाही. याचे सर्व्हेक्षण करा. आज आपल्याला पाणीपट्टीतुन वार्षिक ११ कोटी मिळतात. दोन्ही मिळून ६५ कोटी मिळतात. आम्हाला काय विकास निधी देणार. आपले कर्मचारी नेमा. रिव्हीजन आत्तापर्यंत झाले नाही. सर्व्हेक्षण व्यवस्थीत झालेले नाही. आम्ही १ रु. वाढवून देणार नाही. मुळाडॅम मेन लाईनवरुन किती लोकांनी कनेक्शन घेतले १२ गावांना पणी दिले जाते. कोण किती काम करते ते तपासा कितीतरी लोक सह्या करुन घरी जातात. महानगरपालिकेच्या लोकांकडून किती इमारती आहेत याचे सर्व्हेक्षण करा. खाजगी संस्थेला १० कोटी लागतील.

पुनर्विलोकन वाढविण्या बाबतीत

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** भारतीय जनता पक्षाच्या वतीने कुठलाही कर वाढविण्यास विरोध नोंदवीत आहे. पाणी योजना पूर्ण क्षमतेने घेवू द्या. आता कोणतीही कर वाढ करु नये.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** पुनर्मुल्यांकन करण्यास हरकत नाही पण करवाढ करु नये. मागच्या वेळी खाजगी संस्थेला काम दिले त्यांचे कर्मचारी पैसे घ्यायचे आपल्या कर्मचा-यांकडून रिव्हीजनचे काम करण्यांत यावे.

१२ जुलै २०२१ ला प्रसिध्दी विभागाने अनधिकृत नळ कनेक्शन बाबतीत निवेदन दिले आपण जे फेज - २ वरुन कनेक्शन घेतले त्यांना अनधिकृत करणार का ? फेज-२ च्या लाईनवर परत कनेक्शन घेतले तर अनधिकृत ठरणार का.

**मा.आयुक्त साहेब :-** आपल्याकडे फेज-२ परस्पर घेतले ते रेग्युलराईज करुन घेण्यात यावे. नोंद आपल्याकडे नाही. त्यांची नोंद घ्यावी.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** नगर शहराच्या नागरिकांना असे आपण काय दिले की, आपण करवाढीचा प्रस्ताव ठेवला कोरोनाने अनेकांचे कंबरडे मोडले आहे. सामान्य नागरीक दवाखान्याचे पैसे भरतांना मेटाकुटीस आले आहेत. असे असतांना ३ पटीने वाढीचा प्रस्ताव ठेवला अनेक दिवस पाणी येत नाही रस्त्याची दुरावस्था झाली आहे. बल्ब टयुब बसवू शकत नाही.

पुनर्विलोकनांस कुठल्याही सभासदाचा विरोध नाही. प्रशासनाची चूक आहे दर पाच वर्षांनी मुल्यांकन व्हायला पाहीजे २० वर्षात मुल्यांकन न झाल्याने या झालेल्या मोठया नुकसानीस जबाबदार प्रशासन आहे. कर वाढीचे उत्पन्नाचे इतर स्त्रोत आपण निर्माण करावे. पुनर्मुल्यांकन २० वर्षाने होते आहे. काटेकोरपणे कसे होईल ते पहावे. सक्षम अधिका-याची या करीता नियुक्ती करावी. प्रत्येक ठिकाणी प्रायव्हेटायझेशन करायचे तर आपल्या कर्मचा-यांकडे काहीच काम शिल्लक राहणार नाही. मग आपल्या कर्मचा-यांकडून काय काम करुन घ्यायचे.

करवाढीस राष्ट्रवादी कॉग्रेसचा विरोध नोंदवावा. पुनर्मुल्यांकन करा.

**मा.सौ.रुपाली वारे :-** सावेडी भागात ९ रु.पट्टी आकारता, वेगवेगळे दर का, केडगांव भागामध्ये ४ रु आहे. सन २००५-२००६ मध्ये शहराचे झोनिंग केले होते. पूर्वी चे दर फायनल केलेले आहेत. दराबाबत माहिती दिली. त्यावेळचे जमिनीचे व्यवहार, भाडयाने दिलेले पासुन मिळणारे उत्पन्न यावर निश्चीत केले. प्रभाग समिती क्रमांक १ कडून जास्तीची वसुली होते. विकास निधीही त्या प्रमाणात मिळाला पाहीजे.

**उपायुक्त श्री.डांगे :-** घरपट्टी मागणी ३० कोटी आहे. १० कोटी पाणीपट्टी, चालू मागणी ४५ कोटी थकबाकी १५० कोटी, महानगरपालिका चालवायला महिन्याला १२ कोटी आले पाहीजे. मागच्या बजेट मिटींग मध्ये उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याची चर्चा झाली. इतर महानगरपालिकेत मोठे जास्त रेट आहेत. २००२, २००३ ला रिव्हीजन केली. मागील रिव्हीजनला २० वर्षे झाली. १०० कोटीचा गॅप आहे. उत्पन्न वाढीसाठी काही केले पाहीजे.

**मा.सौ.रुपाली वारे :-** सावेडी भागात सुविधा भेटत नसेल तर लोक कर कसा भरणार.

**उपायुक्त (सा) श्री.डांगे :-** कमीजास्त प्रमाणात सुविधा मिळते. मिळत नाही असे म्हणता येत नाही. शासकीय योजनात आपला हिस्सा असणे महत्वाचे आहे. त्याकरीता रक्कम लागेल. रिव्हीजन केले पाहीजे. कर्मचा-यां मार्फत केले पाहीजे. स्कीलचे काम आहे. त्यामुळे प्रायव्हेट एजन्सीकडून केले तर बरे होईल.

**मा.सौ.रुपाली वारे :-** करवाढीला आमचा विरोध आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** रिव्हीजनमध्ये काय काम करणार.

**उपायुक्त (सा) श्री.डांगे :-** जीपीएस इमेज काढली, जाणार घर निहाय सर्व्हे करणार, मोजमाप होणार आरव्ही ठरेल १०% वजा करुन घरपट्टी ठरेल प्रत्यक्ष घराला भेटी देणार संपूर्ण घर मोजणार हॉल कितीचा, बेड कितीचा सर्व मोजून कॉम्प्यटरायझेशन करुन तुम्ही जो आता रेट ठरवणार त्यानुसार आकारणी होईल.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** भाडेकरी असेल तर त्याला कमर्शियल पट्टी लावणार का.

**उपायुक्त (सा) श्री.डांगे :-** स्थळ पाहणी केल्यानंतर भाडेकरु जो भाडे सांगेल त्याची नोंदणी करणार

**मा.श्री.कुमार वाकळे :-** जे आपल्याकडे कर्मचारी आहेत त्यांना माहिती आहेत कोणाकडे भाडेकरी आहेत कोणाकडे नाहीत. रेट वाढवण्या पेक्षा मालमत्ता जर व्यवस्थीत केली तर कर मिळू शकतो आपले कर्मचारी वर्षाला जावून हप्ता घेतात.

**उपायुक्त (सा) श्री.डांगे :-** म्हणून तर आपण खाजगी एजन्सीकडून करुन घेणार आहोत.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** खाजगी माणसा मार्फत करतांना त्यांच्या सोबत आपला केअर टेकर द्या. त्यांना सर्व घरांची माहिती असते. आता सुध्दा जो कर्मचारी नोंद लावणार नाही, त्यांचेवर कार्यवाही करा.

**उपायुक्त (सा) श्री.डांगे :-** ट्रायल बेसीस वर आपण करुन घेवू.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** कर्मचारी रिशॅपल करा व वसुलीचे झोन वाईज बदला सगळयांची ओळख परेड घ्या.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** भटके कुत्रे पकडणारांची वर्क ऑर्डर दिली. त्यांनी कुठे सोडायचे त्यावर काहीतरी करावे लागेल. निर्बिजीकरण केलेले कुत्रे चावणारे असेल तर त्यास पुढे काय करणार. रेबीज झालेल्या कुत्र्याला इंजेक्शन देता येत नाही.

**उपायुक्त (सा) श्री.डांगे :-** अॅन्टीरेबीज इंजेक्शन द्यावे लागेल.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** मागच्या पंचवार्षीक ९-१० केसेस कुत्रे चावून मेलेले आहेत. त्या कुत्र्यांना रेबीज नाहीत, पण चावणारे आहेत त्यावर काय करणार. निर्बिजीकरण केल्यावर कुत्रे जास्त अॅग्रेसीव्ह होतात.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** आम्हाला नगरसेवक म्हणून हा विषय घ्यायची लाज वाटते. दर सभेस याच विषयावर चर्चा होते त्यावर ठोस निर्णय घ्या.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** सर्व्हेक्षण झालेच पाहीजे. सर्व सदस्यांचे वतीने भाडेदर तीन पट वाढविण्यास मी शिवसेनेच्या वतीने व सभागृहाच्या वतीने विरोध करते. अशा काळात घरपट्टी वाढवू नये पाण्याची अडचण आहे. त्याला नामंजूर करा. सर्वेक्षण जमिनीचे इमारतीचे त्याला मंजूर करावे.

**मा.श्री.अविनाश घुले :-** मागे जीपीएस सर्व्हेचे जे काम दिले त्याची माहिती घ्या.

**श्री.अंबादास साळी :-** १ कोटी ५२ लाख २०१७ मध्ये काम दिले. ३० हजार प्रॉपर्टी सर्व्हे केला.

**मा.श्री.अविनाश घुले :-** तो बरोबर होता.

**श्री.अंबादास साळी :-** सर्वे रिव्हीजन विभागाशी निगडीत होता.

**रिव्हीजन विभाग श्री.चाफे :-** जीपीएस सर्व्हे झाल्यानंतर ५० हजार प्रॉपर्टी फॉर्म रिव्हीजन विभागाकडे जमा झाले. तपासणी पुर्ण होवून ५२२६ तपासून झाले. ब-याचशा फॉर्म मध्ये त्रुटी आढळून आल्या. ब-याचशा नागरिकांच्या तक्रारी आल्या त्यामुळे त्यांचे काम थांबविण्यांत आले.

**मा.श्री.अविनाश घुले :-** पहिले पाढे पंचावन्न असे व्हायला नको. ते कंपनीचे आर्थिक तडजोडी करायचे बोगस काम केले तो कडू अनुभव लक्षात घेता त्यामुळे आता पुढे काम करतांना आपले कंट्रोलिंग आवश्यक आहे. त्रयस्थ कंपनीकडून ते करुन घ्यावे. एखाद्या झोनचे काम पहावे मग पुढचे ठरवावे.

**उपायुक्त श्री.डांगे :-** प्रत्येक ५ वर्षांत रिव्हीजन झाले पाहीजे.

**मा.श्री.अविनाश घुले :-** मग आत्तापर्यंत का झाले नाही. उत्पन्नाच्या एवढया महत्वाच्या बाबी असतांना का झाले नाही. वेळच्यावेळी झाले असते तर सभागृहात बोलायची वेळ आली नसती. याला कोण जबाबदार आहे.

**उपायुक्त श्री.डांगे :-** मागे झालेल्या चूका दुरुस्त करायच्या आहेत.

**मा.श्री.अविनाश घुले :-** स्थायी समिती अर्थसंकल्पीय सभेस काही लेखाशिर्षकामध्ये प्रयत्न केल्यास वाढ होवू शकते. उत्पन्नाच्या स्त्रोतावर कोणती कारवाई करण्यांत आली. उत्पन्न वाढी बाबत एक अधिकारी

माझ्याकडे चर्चे करीता आला नाही. पाणीपुरवठा मिटींग नंतर बोगस कनेक्शन बाबती त जाहीरात करणे गरजेचे आहे. अजुन नागरीकांपर्यंत गेलेला नाही. घंटागाडी मार्फत नागरिकांना अवाहन करावे. नागरिकांनी २२०० रुपय्र भरुन कनेक्शन घेतो. फेज-२ परत कनेक्शन घेतांना लोकांनी काय करायचे.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** सभागृहाने धोरण ठरविले. फेज-२ च्या ठिकाणी कनेक्शन जरी असेल तरी महानगरपालिकेच्या एजन्सीने ठरविलेली रक्कम भरावी लागणार. तेथे ऑलरेडी फेज-२ कनेक्शन घेणे क्रमप्राप्त नाही. त्यांना रेग्युलराईजच करुन घ्यावे लागणार.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** अनधिकृत कडून ४२०० रुपये कसे घेतात.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** माझे जरी जुन्या लाईनवर कनेक्शन आहे तरी मला फेज-२ वर नविन कनेक्शन घेतांना, ठरवलेले कनेक्शनचे पैसे भरावे लागतील.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** आपल्या ड्रेनेजलाईन, पाईपलाईन, रस्त्याचे कामाचे वेळी महानगरपालिके मार्फतच रस्त्याची नुकसान होवू नये म्हणून कनेक्शन जोडून घेण्यांस सांगण्यांत आले होते. त्यामुळे वॉर्डातील नागरिकांनी कनेक्शन घेतले आहेत. त्यामुळे फेज-२ ज्यांनी कनेक्शन घेतले त्यांचेकडून दंड आकारणी करु नये.

**मा.आयुक्त साहेब :-** सभागृहाला फेर धोरण ठरवावे लागेल. सभागृहाकडून जर सूचना आल्या तर प्रशासन विचार करेल.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** रुलिंग द्या.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** ६० हजार कनेक्शन फेज-२ वर यायचे आहेत. ते जर माफ करायचे झाली तर ती किती रक्कम होईल. महानगरपालिका आकारत असलेली रक्कम दंड नाही. ती नविन कनेक्शन घेण्यासाठीची रक्कम आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** दंड कॅन्सल करु.

**मा.महापौर साहेब :-** दंड कॅन्सल करु.

**मा.श्री.अविनाश घुले :-** बिगर शेती करतांना टॅक्स लावणे अपेक्षित आहे. त्यांचेकडून कोणतेही शुल्क लागले जात नाही. असे निदर्शनास आले आहे.

**उपायुक्त श्री.डांगे :-** एन.ए टॅक्स तलाठी भरुन घेतो.

**इंजिनियर श्री.बल्लाळ :-** इथुन पुढे आयुक्तांनी वसुल करायचा आहे. ते पाहतो आहोत. कर निश्चित तेच करणार फक्त वसुल आपण करायचा.

**उपायुक्त श्री.डांगे :-** नविन महसुल संहिते मार्फत तलाठी सक्षम आहेत. शासनाला मार्गदर्शन सांगीतले आहे. नगरविकास विभागाचे मार्गदर्शन मागविले आहे. त्यानंतर कार्यवाही होईल. तलाठ्याने वसुल करणे अभिप्रेत आहे. आपलेच काम आपल्याला होत नाही.

**मा.श्री.अविनाश घुले :-** नविन वैद्यकीय व्यावसायीकांचा शोध घेवून बॉम्बे नर्सींग होम अॅक्ट पासुन मिळणा-या फी मध्ये वाढ करावी. महानगरपालिकेच्या मोक्याच्या जागा नेहरुमार्केट, एन.सी.सी.ऑफिस वरील जागा असेल पुढे प्रस्ताव तयार करु. असे प्रस्ताव तयार आहेत का.

**मा.आयुक्त साहेब :-** याबाबत दोन बैठका झाल्या. दोन तांत्रिक सल्लागार त्यांना दिले. ५ प्रोजेक्ट घेत आहोत. आराखडा तयार करण्यांस सांगितले आहे.

**मा.श्री.अविनाश घुले :-** गाळे हस्तांतर करण्याची प्रक्रीया प्रभावीपणे राबवावी. अनधिकृत बांधकाम नियमानुकूल करणे, मालमत्तांच्या नोंदी नाहीत. यासाठी ठोस निर्णय घ्यावा. गुंठेवारी, जाहीरात बोर्ड भाडे वाढ केल्यास उत्पन्नात वाढ होईल. यावर लक्ष द्यावे. भाडयाने दिलेल्या शाळा खोल्यांच्या थकबाकीदारांवर कडक

कारवाई करावी. बंद असलेल्या शाळा खाजगी तत्वाने भाड्याने द्याव्यात, पे ॲण्ड पार्क अनधिकृतपणे चालू आहे. ते सुध्दा उत्पन्न वाढीचा स्त्रोत आहे. मोबाईल टॉवर प्रशासनाचे शुल्क, मोबाईल टॉवर दंडात्मक शुल्क यापासुन उत्पन्न मिळू शकते ते प्रशासनाने गंभीरपणे दखल घ्यावी. एकजीवाने काम केले तर नविन शहरात चांगला मॅसेज जाईल. कडक कारवाई करुन उत्पन्नात कशी भर पडेल यासाठी प्रशासनाने लवकरात लवकर कारवाई करावी.

**मा.सौ.कमल सप्रे :-** प्रस्ताव क्रमांक २२ भाडे मूल्य दरात तीन पटी दराबाबत मी बोलते. रेडीरेकनर दर ४ वर्षापासुन तेच ठेवले आहेत. लॉकडाउन, अनलॉकडाउनमुळे जनता भरडली आहे. ४१ हजार मालमत्ता आहेत. खाजगी सर्व्हेक्षण केले तरी ५० हजार मिळकती मिळतील.

राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीच्या वतीने विरोध, २००४-२००५ साली बांधकाम काम केले असेल तर त्या मिळकतींना आज आकारणी करतांना सन २००४-२००५ पासून कशी आकारणी करणार ?

**उपायुक्त (सा) श्री.डांगे :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये मागील सहा वर्षापर्यंत आकारणी करण्याची तरतुद आहे.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

कार्यालयीन आदेश. जा.क्र.नगरसचिव विभाग.वशि.- दिनांक : ०३/०८/२०२१

**विषय : अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
गुरुवार दिनांक १२/०८/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सींग व्दारे होणा-या सर्वसाधारण सभे बाबत...

प्रति,
१) श्री.शांतवन बडेकर, उपायुक्त कार्यालय,
२) श्री.आनंदा झारखंडे, आस्थापना विभाग,
३) श्री.सुभाष ढगे, स्थायी समिती कार्यालय,
४) श्री. बाबासाहेब गुंड, महापौर कार्यालय,
५) श्री.दयानंद साळवे, विरोधी पक्ष नेता कार्यालय
६) श्री.प्रदीप निलाखे, महिला व बालकल्याण समिती कार्यालय,
७) श्री.राज चोटीले, सिक्युरिटी गार्ड
अहमदनगर महानगरपालिका.

यांस.-

आदेशीत करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक १२/०८/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सींग व्दारे **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर** येथे होणार आहे.

तरी आपण सकाळी १०.०० वाजता कार्यालयीन गणवेशात हजर रहावे व मनपा हवालदार यांच्या सूचनेनुसार काम पहावे.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : महानगरपालिका हवालदार, अहमदनगर महानगरपालिका यांस माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**कार्यालयीन आदेश.** जा.क्र.नगरसचिव विभाग.वशि.- दिनांक : ०३/०८/२०२१

**विषय : अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
गुरुवार दिनांक १२/०८/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता होणा-या मा.सर्वसाधारण सुचना क्रमांक ०३ मध्ये आपले नावासमोरील नगरसेवकांना व्हिडीओ कॉन्फरन्सींग बाबत मार्गदर्शन करणे बाबत...

कळविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.विशेष सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक ०३ **गुरुवार दिनांक १२-०८-२०२१ रोजी दुपारी १.० ० वाजता** व्हिडीओ कॉन्फरन्सींग व्दारे **अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी खालील प्रमाणे आपल्या नावासमोर दर्शविलेल्या सन्माननीय सदस्यांना व्हिडीओ कॉन्फरन्सींग बाबत मार्गदर्शन करावे.

| अ. क्रं. | प्रभाग/जागा क्रमांक | उमेदवाराचे नाव | मोबाईल क्रमांक | तांत्रिक सहाय्यक |
|---|---|---|---|---|
| १ | ११ - ब | घुले अविनाश हरिभाऊ<br>**सभा□ती, स्थायी समिती** | 9225322062 | श्री.विष्णु देशमुख |
| २ | ११ - ड | शेख नजीर अहमद अ.रज्जाक | 9272225862 | |
| ३ | १२ - अ | बाळासाहेब मारुती बा□ाटे | 9422222079 | |
| ४ | १२ - ड | कावरे दत्तात्रय हरीभाऊ | 9881777760 | |
| ५ | १३ - अ | कवडे उमेश (गणेश) खंडेराव | 9270443333 | |
| ६ | १३ - ड | लोंढे सुभाष स□ानराव | 9921799992 | |
| ७ | १४ - अ | भागानगरे प्रकाश बाबुराव | 9422230181 | |
| ८ | १४ - ड | भा□ले गणेश □ुंडलिक<br>**उ□महा□ौर** | 9422221596 | |
| ९ | १५ - अ | गायकवाड □रसराम बाळू | 9860536395 | |
| १० | १५ - ड | शिंदे अनिल माधवराव | 9422223268 | |
| | | | | |
| ११ | ०४ – क | य□गीराज शशिकांत गाडे | 9689896982 | श्री.किरण उजागरे |

| अ. क्रं. | प्रभाग/जागा क्रमांक | उमेदवाराचे नाव | मोबाईल क्रमांक | तांत्रिक सहाय्यक |
|---|---|---|---|---|
| १२ | ०५ – अ | दुलम मनज लक्ष्मण | 9225700007 | |
| १३ | ०५ – ड | गंधे (भैय्या) महेंद्र महनिराज | 9422220460 | |
| १४ | ०६ – ड | बारस्कर रविंद्र रावसाहेब **सभागृहनेता** | 9422221333 | |
| १५ | ०७ – ब | बडे अशाक किसन | 9822451468 | |
| १६ | ०७ – ड | वाकळे कुमार बबन | 9730015555 | |
| १७ | ०८ – क | शिंदे सचिन चंद्रशेखर | 9422229078 | |
| १८ | ०८ – ड | नळकांडे शाम किसन | 9271907171 | |
| १९ | ०९ – क | छिंदम श्रीाद शंकर | 9823055555 | |
| २० | १० – अ | उणावणे अक्षय सदानंद | 9130065007 | |
| | | | | |
| २१ | ०६ - ब | वाकळे बाबासाहेब सन्याबा, | 9422226510 | श्री.किशोर कानडे |
| २२ | १० - ड | शेख मुदस्सर जहांगीर | 8007863232 | |
| २३ | ०४ – ड | शिंदे स्वप्निल रहिदास | 7774937777 | |
| २४ | ०१ – ड | बारस्कर संत विजय **विराधी क्ष नेता** | 9890408050 | |
| २५ | ०१ – अ | बरुडे सागर अर्जुन | 9822115406 | |
| २६ | ०२ – अ | ाऊलबुधे विनीत नाथ | 9822076968 | |
| २७ | ०२ – ड | त्र्यंबके सुनिल नारायण | 9552690159 | |
| २८ | ०३ – अ | आसिफ सुलतान | 9822828589 | |
| २९ | ०३ – ड | खान समद वहाब | 9860147715 | |
| | | | | |
| ३० | ०९ – ड | सुप्रिया धनंजय जाधव | 9860655555 | श्रीमती. हेमलता साळवे |
| ३१ | १० – ब | जाधव अश्विनी सचीन | 9850100009 | |
| ३२ | १० – क | ंजाबी अनिता जसलसिंग | 9422236460 | |
| ३३ | ११ - अ | ारगे रुाली जसेफ | | |
| ३४ | ११ - क | कुरेशी रवीन आबीद | 9665025555 | |
| ३५ | १२ - ब | सुरेखा संभाजी कदम | 9422222003 | |
| ३६ | १२ - क | लखंडे मंगल सुनिल | 9423561112 | |
| ३७ | १३ - ब | चितळे सनाली अजय | 9881451331 | |
| ३८ | १४ - ब | जगता शितल संग्राम | | |
| ३९ | १४ - क | चडा मीना संजय | 9822025757 | |
| | | | | |

| अ. क्रं. | प्रभाग/जागा क्रमांक | उमेदवाराचे नाव | मोबाईल क्रमांक | तांत्रिक सहाय्यक |
|---|---|---|---|---|
| ४० | ०४ – ब | ब□कर श□भा सुधाकर | 9225522255 | श्रीमती.मेघना निकम |
| ४१ | ०५ – ब | शिंदे स□माबाई तायगा | 7350333303 | |
| ४२ | ०५ – क | आशा शिवाजीराव कराळे | 9422221015 | |
| ४३ | ०६ – अ | जाधव □ल्लवी दत्तात्रय | 9604390180 | |
| ४४ | ०६ – क | ताठे वंदना विलास | 9527525888 | |
| ४५ | ०७ – अ | भाकरे रीता शैलेश | 9860755573 | |
| ४६ | ०७ – क | सप्रे कमल दत्तात्रय | 9822051375 | |
| ४७ | ०८ – अ | शेंडगे र□हिणी संजय **महा□ौर** | 9822788388 | |
| ४८ | ०८ – ब | ब□रुडे □ष्□ा अनिल | 9422227473 | |
| ४९ | ०९ – अ | चव्हाण शीला दी□ | 9422221555 | |
| | | | | |
| ५० | ०९ - ब | ढ□गे मालन सुरेश | ९९२३३१४२२४ | सौ.जोशी स्मिता |
| ५१ | १७ – क | शेळके लताबाई बलभिम **सभा□ती,महिला व बा.समिती** | 9657979797 | |
| ५२ | १३ – क | गेनाप्□ा सुवर्णा संजय **उ□सभा□ती, मबाकस** | 9420689999 | |
| ५३ | ०१ – ब | सौ.मिना शिवाजी चव्हाण | 8788206185 | |
| ५४ | ०१ – क | बारस्कर दि□ाली नितीन | 9822415757 8087099198 | |
| ५५ | ०२ – ब | वारे रु□ाली निखील | 9850000852 | |
| ५६ | ०२ – क | □वार संध्या बाळासाहेब | 9561252700 8888757636 | |
| ५७ | ०३ – ब | खान मीनाज जाफर | 9021112312 | |
| ५८ | ०३ – क | शेख रिजवाना फारूक | 9881870245 | |
| ५९ | ०४ – अ | सौ.ज्य□ती अम□ल गाडे(कर्डीले) | 8975872525 | |
| | | | | |
| ६० | १५ - ब | जाधव सुवर्णा दत्ता | 9271881256 | श्री.उपलंची |

| अ. क्रं. | प्रभाग/जागा क्रमांक | उमेदवाराचे नाव | मोबाईल क्रमांक | तांत्रिक सहाय्यक |
|---|---|---|---|---|
| | | | 9404615151 | |
| ६१ | १५ - क | खैरे विद्या दि□क | 9881742471 | |
| ६२ | १६ - अ | शिंदे शांताबाई दामोदर | 9890537625 | |
| ६३ | १६ - ब | क□सकर सुनिता संजय | 8888026575 | |
| ६४ | १६ - क | □ठारे विजय मोहनराव | 9623240303 | |
| ६५ | १६ - ड | येवले ज्ञानेश्वर ऊर्फ अमोल शिवाजी | 9881778181 | |
| ६६ | १७ - अ | कांबळे राहुल दादु | 9922708803 | |
| ६७ | १७ - ब | ननावरे गौरी गणेश | 9422319181 | |
| ६८ | १७ - ड | क□सकर मनोज शंकर | 9890449126 | |
| | | | | |
| ६९ | स्विकृत सदस्य | आढाव मदन सं□त | ९२७२८१७१११ | श्री.सोनु चौधरी |
| ७० | स्विकृत सदस्य | शेळके संग्राम बबनराव | ९६८४११११११ | |
| ७१ | स्विकृत सदस्य | आंधळे रामदास नानाभाउ | ९८२३०३६१६१ | |
| ७२ | स्विकृत सदस्य | शेटीया वि□ुल मुलचंद | ९८२२०६९८११ | |
| ७३ | स्विकृत सदस्य | कातोरे राजु आसाराम | ९८९०९०२२९१ | |

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

कार्यालयीन आदेश. जा.क्र.नगरसचिव विभाग.वशि.- दिनांक : ०३/०८/२०२१

संबंधीत खाते प्रमुख व शाखा प्रमुख,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस.-

कळविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक ०३ **गुरुवार दिनांक १२-०८-२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता** व्हिडीओ कॉन्फरन्सींग व्दारे **अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी आपल्या नावासमोर दर्शविलेल्या कामाची आपण पुर्तता करावी.

उपायुक्त (सा),
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत :-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख | : | महानगरपालिका सभागृहाचे आसपासचे भागाची साफसफाई करुन घेण्याबाबत संबंधितांस सुचना द्याव्यात. |
| २) | प्रसिध्दी अधिकारी | : | बैठकीची सुचना व विषयपत्रिका या सोबत जोडली आहे. त्याची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रात त्वरीत प्रसिध्द करावी व प्रसिध्दीचे २ (दोन) अंक इकडेस पाठवावेत. सदरच्या येणा-या खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. |
| ३) | इलेक्ट्रीक विभाग प्रमुख | : | वरीलप्रमाणे नोंद घेवून महानगरपालिका सभागृहातील सभेकरीता लाईट व लाऊड स्पीकरची व्यवस्था करण्यात यावी. तसेच नेहमीप्रमाणे टेपरेकॉर्डची सुध्दा व्यवस्था करण्यात यावी. सदर दिवशी विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| ४) | श्री.दत्तात्रय ढवळे, स्वीय सहाय्यक, आयुक्त कार्यालय, | : | आपण सभेपुर्वी महानगरपालिका सभागृहात उपस्थित राहुन संपुर्ण सभेचे प्रोसिडींग घेण्याचे काम करावे. |
| ५) | श्रीमती.मेघना निकम, नगरसचिव विभाग | : | महानगरपालिका सभागृहात राष्ट्रगीत म्हणणे करीता सभेपुर्वी उपस्थित रहावे. |
| ६) | मनपा हवालदार | : | वरील प्रमाणे नोंद घेवुन महानगरपालिका सभागृहात आवश्यक ती पुर्तता करावी. |

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.
प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
# नगरसचिव विभाग
---*---

**अहमदनगर महानगरपालिकेची सभा सुचना क्रमांक ०३, गुरुवार दि. १२/०८/२०२१ रोजीचा सर्वसाधारण सभेचा अजेंडा वाटप करण्यास मिळाले बाबत स्वाक्षरी.**

| पान क्रमांक | नांव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | श्री.बाळासाहेब भोर | |
| २ | श्री.उन्मेश क्षिरसागर, | |
| ३ | श्री.आनंदा झारखंडे | |
| ४ | श्री.बाबासाहेब कोतकर | |

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

नगरसचिव विभाग.- दिनांक : २१/०६/२०२१

विषय : गुरुवार दिनांक - १२ / ०८ /२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता झालेल्या मा.विशेष सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक ०३ च्या चहापान खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत...

सादर,

विनंती रिपोर्ट की, महाराष्ट्र शासनाचे शासन परिपत्रक क्रमांक एम.सी.ओ. ४६८५-१८८२ सी. आर.६८-८६-युडी-१४ दिनांक २९ जुलै १९८६ अन्वये कळविले आहे की, चहा व इतर पदार्थांचे दर बदलत असतात म्हणून चहापानाचे कमाल दर परिपत्रकान्वये ठरवून देण्याची आवश्यकता वाटत नाही. कौन्सीलच्या सांविधीक समितीच्या बैठकीसाठी मनपा/नपा यांनी चहापानाचा खर्च आकस्मिक निधीतून (कॉन्टीजन्सी एक्सपेंन्डीचर) किती करावा हे प्रत्येक नगरपालिकेने ठरवावे त्याप्रमाणे खर्च करावा, अशी तरतूद आहे.

अहमदनगर महानगरपालिका सर्वसाधारण सभा क्र. १ दिनांक १७/०२/२०१२ अन्वये अहमदनगर महानगरपालिका खास सभा/सर्वसाधारण सभेचा चहापान खर्च रक्कम रु. १८,०००/- करणेत आला आहे. अहमदनगर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक ३ गुरुवार दिनांक १२/०८/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर येथे व्हीडीओ कॉन्फरन्सींग व्दारे झाली आहे.

सदर अहमदनगर महानगरपालिकेच्या सभागृहात आयोजित केलेल्या या सभेस उपस्थित सभासदांचे चहापानाकरीता रक्कम रु.५,०३०/- (अक्षरी रक्कम रुपये पाच हजार तीस मात्र) च्या झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळावी, सदरचा खर्च नगरसचिव विभागाच्या *** सभेचे चहा नाष्टा बील *** या लेखाशिर्षाअंतर्गत दर्शविण्याच्या मान्यतेस्तव तसेच सदरचा खर्च श्री.किशोर कानडे, लिपीक टंकलेखक, अहमदनगर महानगरपालिका यांनी केला असुन सदरचा धनादेश श्री.किशोर चंद्रकांत कानडे, अहमदनगर महानगरपालिका यांचे नांवे काढणे बाबत मुख्यलेखाधिकारी यांना आपलेस्तरावरुन आदेश होणेस विनंती आहे.

| | | |
|---|---|---|
| **तरतुद** | : | **४,००,०००/-** |
| **पुर्वीचा खर्च** | : | |
| **हया बीलात दाखविलेला खर्च** | : | |
| **२ व ३ ची बेरीज** | : | |
| **उपलब्ध शिल्लक** | : | |

प्र.नगरसचिव,
नगरसचिव विभाग,
अहमदनगर महानगरपालिका.